# युवाराष्ट्र दर्शन

RNI No. MAHMAR/2008/26657 E-mail : yuvarashtradarshan.com

नागपूर, बुधवार, दिनांक २१ जानेवारी २०२६ ■ वर्ष १७ ■ अंक ३२९ ■ पाने ८ ■ किंमत रु. २/- वितरण खर्च रु.१ = एकूण ३ रुपये


## संपादकीय

### केवढी ही क्रुरता

चार दिवसांपूर्वी बापलेकाने एका तरुणीवर सामूहिक अत्याचार केल्याचे वाचनात आले आणि मन सुन्न झाल. केवढी ही क्रुरता असा प्रश्न मनात निर्माण झाला. प्रकरण चंद्रपूरपासून सुरू झाले. मुलगी आणि आरोपी बापलेक हे मुळचे चंद्रपूरचे राहणारे आहेत. आरोपी मुलाचे कपड्याचे दुकान आहे. एक दिवस मुलगी कपड्याच्या दुकानात गेली. बिल तयार करण्यासाठी त्याने मुलीला तिचा मोबाईल क्रमांक मागितला. त्यानंतर तो या नंबरवर मुलीला वारंवार फोन करून त्रास द्यायला सुरुवात केली. परंतु, ती त्याला प्रतिसाद देत नव्हती. ऐके दिवशी पुन्हा ती त्याच्या दुकानात कपडे खरेदीसाठी गेली. त्यावेळी त्याने चेंजींग रूममध्ये छुपा कॅमेरा बसविला होता. कपडे बरोबर होतात की नाही हे पाहण्यासाठी ती चेंजींग रूममध्ये गेली असता मुलाने तिचा व्हिडियो तयार केला. हा व्हिडियो तिला दाखवित त्याने तिला ब्लॅकमेल करायला सुरूवात केली. तिच्याकडून त्याने पैसे उकळले. त्यानंतर तिच्यावर लैंगिक अत्याचार सुरू केला. बदनामीच्या भितीपोटी मुलगी सगळ सहन करीत होती. इकडे आड, तिकडे विहीर अशी तिची अवस्था झाली होती. हिंमत करून त्याने त्याच्याविरोधात स्थानिक पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपी मुलाला अटक केली. त्यानंतर मुलगी नागपूरला आली. काम करून ती आपला उदरनिर्वाह करीत होती. आरोपीला ही माहिती समजताच तो देखील आपल्या बापासह नागपूरला आला. पोलिसात केलेली तक्रार मागे घेण्यासाठी त्यांनी तिच्यावर दबाव आणला. परंतु, ती तक्रार मागे घ्यायला तयार नव्हती. त्यानंतर दोघाही बापलेकांनी तिच्यावर सामूहिक अत्याचार केला. महापालिका निवडणुकीचा काळ असल्याने या घटनेचा जास्त गाजावाजा झाला नाही. परंतु, आधीच एक गुन्हा दाखल असुनही पुन्हा गुन्हा करताना आरोपींना काहीच का वाटले नाही. त्यावरून आरोपींना पोलिसांचा धाक उरला नाही हे लक्षात येते. या नराधमांना भर चौकात नागवे करून त्यांना फटके द्यायला हवेत. त्याशिवाय आरोपींवर पोलिसांचा अंकुश राहणार नाही हे यावरून दिसून येते. शेवटी मन म्हणतेच आरोपींमध्ये एवढी क्रुरता का? याचे उत्तर कधीही मिळणार नाही हेही तेवढेच सत्य आहे.

## महाराष्ट्र भारताच्या भविष्याचे पॉवर हाऊस : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

- पहिल्याच दिवशी १४ लाख ५० हजार कोटी गुंतवणूकींचे १९ सामंजस्य करार
- पंधरा लाख रोजगार संधी, आयटी, डाटा सेंटर, हरित ऊर्जा क्षेत्रात गुंतवणूक
- गतवर्षीच्या टप्पा ओलांडून, यंदा विक्रमी गुंतवणूकीचा विश्वास

**वृत्तसंस्था**
**दावोस, दि. १०**

भारतातील उद्योग आणि गुंतवणूक क्षेत्रासाठी महाराष्ट्रच गेटवे-ऑफ-इंडिया' असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विधान खरे ठरवणारे तब्बल १४ लाख ५० हजार कोटींचे गुंतवणूक करार पहिल्याच दिवशी करण्यात आले. या गुंतवणूकीसोबतच राज्यात १५ लाख रोजगार संधी निर्माण होणार आहेत.



महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागाच्या माध्यमातून यंदा विविध विभागांनी आणि विविध क्षेत्रातील उद्योगांच्या प्रतिनिधी समवेत मुख्यमंत्री श्री. फडणवीस, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

हरित ऊर्जा, अन्न प्रक्रीया, पोलाद निर्मिती, आयटी-आयटीईस, डाटा सेंटर्सह ईव्ही-ऑटोमोबाईल, जहाज बांधणी, डीजिटल इन्फ्रा अशा विविध क्षेत्रातील ही गुंतवणूक मुंबईसह राज्याच्या रत्नागिरी, पालघर, गडचिरोली, अहिल्यानगर या भागात पोहचणार असल्याने, तेथे उद्योग वाढीसह मोठ्या प्रमाणा रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्यासह महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागाचे प्रतिनिधीमंडळ दावोस येथे उपस्थित आहे. दावोस मधील पहिल्याच दिवसापासून जगभरातील विविध क्षेत्रातील उद्योगांनी महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी स्वारस्य दर्शवणे सुरु केले. यातून गुंतवणुकीचा मोठा ओघ सुरु झाल्याने महाराष्ट्र पॅव्हेलियनमध्ये उत्साहाचे चित्र निर्माण झाले.

तत्पुर्वी, दावोस मधील महाराष्ट्र पॅव्हेलियनचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्या उपस्थितीत उद्धाटन झाले.' भविष्याचे वेध घेण्यासाठी सज्ज, विश्वासार्ह आणि दीर्घकाळचा भागीदार म्हणून महाराष्ट्र स्वागत करीत आहे. भारताच्या भविष्याचे पॉवर हाऊस म्हणून महाराष्ट्र जगाला, उद्योग विश्वाला साद घालत आहे, अशी मनोदय भावनाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केली.

सामंजस्य करारांवरील स्वाक्षरी व करारांच्या आदान-प्रदान प्रसंगी झालेल्या चर्चेत मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, 'महाराष्ट्रावरील उद्योग क्षेत्राचा, गुंतवणूकदारांचा हा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी आम्ही सदैव सज्ज आहोत. येथे होणाऱ्या करारांवरील पुढील कार्यवाहीबाबत वॉर रूमच्या माध्यमातून लक्ष ठेवण्यात येईल. उद्योजकांना आवश्यक सुविधा वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने मिळाव्यात याची काळजी घेतली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

उद्योजक गुंतवणूकदारांकडून मिळत असलेला प्रतिसाद पाहता, यंदा गतवर्षीहून अधिक गुंतवणूक आणि रोजगार संधीचे सामंजस्य करार होतील असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. विशेषतः मुंबईतील घन कचरा व्यवस्थापन, हवा आणि पाणी गुण संनियत्रणाच्या माध्यमातून सर्क्युलर ईकॉनॉमीची संरचना उभी केली जात आहे. तसेच महाराष्ट्र हे अमर्याद संधीचे राज्य आहे. त्याबाबत आणि एमएमआर क्षेत्राच्या विकासासह, तिसऱ्या मुंबईच्या निर्मितीसाठी महाराष्ट्र आर्थिक सल्लागार समितीने आराखडा निश्चित करून दिला आहे. या माध्यमातून व्यवसायाच्या आणि चांगल्या पगाराच्या रोजगार निर्मितीवर भर दिला जात असल्याचेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यावेळी म्हणाले.

दरम्यान, आगामी दोन दिवसात दावोसमध्ये एआय, क्वांटम कंम्प्युटींग, डीजिटल इन्फ्रास्ट्रक्चर, यांसह फिनटेक, लॉजिस्टिक्स अँण्ड इन्फ्रास्ट्रक्चर तसेच जहाज बांधणी, ईव्ही, अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातील आणखी काही उद्योग घटकांशीही गुंतवणूकीचे सामंजस्य करार होणार आहेत. त्यादृष्टीने त्यांच्या प्रतिनिधींशी, बोलणी चर्चांच्या फेऱ्या सुरू करण्यात आल्या आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार गतवर्षी स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा कक्ष या गुंतवणूक आणि उद्योग सुलभतेला प्रोत्साहन देणाऱ्या समर्पित संस्थात्मक व्यवस्थेमुळे यंदा गुंतवणूकदार, उद्योग क्षेत्राचा महाराष्ट्राकडील ओघ आणखी वाढला आहे.

ज्यांनी महाराष्ट्रात आणखी गुंतवणूक आणि विस्तार करण्याची तयारी दर्शवली असे: कोकाकोला, आयकिया, स्कोडा ऑटो.

याशिवाय, कार्लसबर्गचे सीईओ जेकब अँडरसन यांनी महाराष्ट्रातील गुंतवणूकीला पोषक वातावरणाचे कौतुक करताना राज्याच्या उद्योग धोरणाला दाद दिली. कंपनी लवकरच भांडवली बाजारात आयपीओ आणण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी कोका-कोलाकंपनीचे सीनिअर व्हाईस प्रेसिडेंट मायकेल गोल्टझमन यांच्या समवेत देखील मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी गुंतवणुकीच्या अनुषंगाने चर्चा झाली.

### सामंजस्य करार पुढीलप्रमाणे...

- महाराष्ट्र सरकार-कालसबर्ग, गुंतवणूक : ५०० कोटी
- महाराष्ट्र सरकार-योकी ग्रीन एनर्जी प्रा. लि., गुंतवणूक : ४ हजार कोटी
- महाराष्ट्र सरकार-बीएफएन फॉर्जिंग्स, गुंतवणूक: ५६५ कोटी
- एमएमआरडीए-सुमिटोमो रियालिटी, गुंतवणूक: सुमारे ८ बिलियन डॉलर्स
- एमएमआरडीए-के. रहेजा, गुंतवणूक: सुमारे १० बिलियन डॉलर्स
- एमएमआरडीए-अल्टा कॅपिटल/पंचशील, गुंतवणूक: सुमारे २५ बिलियन डॉलर्स
- एमएमआरडीए-एसबीजीसमूह, गुंतवणूक: सुमारे २० बिलियन डॉलर्स
- एमएमआरडीए- आयआयएस एम ग्लोबल, गुंतवणूक: सुमारे ८ बिलियन डॉलर्स
- महाराष्ट्र सरकार-सुरजागड इस्पात गुंतवणूक: २० हजार कोटी
- महाराष्ट्र सरकार-लोढ्डेव्हलपर्स गुंतवणूक: १ लाख कोटी

## आरक्षणाची चिठ्ठी की राजकीय चक्रव्यूह?

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २०**

मुंबई महापौरपदाची निवड आता फक्त निवडणुकीनंतरची औपचारिक बाब राहिलेली नाही. आरक्षणाच्या सोडतीने सत्तेची दिशा बदलण्याची वेळ आली आहे. गुरुवारी मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावरील परिषद सभागृहात सकाळी ११ वाजता २९ महानगरपालिकांच्या महापौरपदाच्या आरक्षणाची सोडत होणार असून, या एका प्रक्रियेवर मुंबईच्या सत्तासमीकरणाचा भविष्यातील आराखडा अवलंबून असल्याचे चित्र आहे. नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सोडतीकडे सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे.

याचे कारण स्पष्ट आहे. मुंबई महापौरपदाचे आरक्षण जर अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात गेले, तर सत्ताधारी भाजपशिवसेना महायुतीकडे बहुमत असूनही महापौरपदासाठी योग्य उमेदवार उरणार नाही. याच वेळी, सत्तेबाहेर असलेले उद्धव ठाकरे यांच्या गटाला अनपेक्षित राजकीय संधी मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. महापालिकेतील विद्यमान संख्याबळ पाहता, भाजपशिवसेना महायुतीकडे एसटी प्रवर्गातील एकही निवडून आलेला नगरसेवक नाही. याउलट, एसटीसाठी राखीव असलेल्या प्रभाग क्रमांक ५३ आणि १२१ मधून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट)चे जितेंद्र वळवी आणि प्रियदर्शनी ठाकरे विजयी झाले आहेत. त्यामुळे एसटी आरक्षण पडल्यास ठाकरे गटाचा महापौर बिनविरोध निवडून येण्याची शक्यता बळावते.

## सुधीर मुनगंटीवार आणि विजय वडेट्टीवार आमने सामने

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**चंद्रपूर, दि. २०**



चंद्रपूर महानगरपालिकेमध्ये भाजपसोबत राहूनच विकास साधला जाऊ शकतो असे वाटत असल्याने काँग्रेसच्या नगरसेवकांचा एक गट आमच्या संपर्कात असल्याचा दावा भाजपचे आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केला आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे चंद्रपूरच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. सुधीर मुनगंटीवार यांनी केलेल्या वक्तव्याच्या अनुषंगाने काँग्रेसचे आमदार व विधानसभा काँग्रेसचे अध्यक्ष विजय वडेट्टीवार यांना विचारणा केली असता ते म्हणाले सुधीर मुनगंटीवार यांचे वक्तव्य हे कल्पनेसारखे आहे. उलट भाजपचेच नगरसेवक आमच्या संपर्कात आहेत. त्यामुळे काँग्रेसचे नगरसेवक भाजपाच्या संपर्कात असण्याचा प्रश्नच नाही. प्रत्येक पक्ष आपापले नगरसेवक सांभाळून आहेत.

## जिवे मारण्याची धमकी देत विनयभंग

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २०**

खाजगी शिकवणीवरून घरी जाण्यास निघालेल्या एका विद्यार्थिनीचा विनयभंग केल्याप्रकरणी वाठोडा पोलिसांनी राज जितू खरे (२०) कौशल्यानगर, पिवळी नदी यास अटक केली.

१८ जानेवारी रोजी सकाळी १० च्या सुमारास पीडित १६ वर्षीय मुलगी खाजगी शिकवणीला गेली होती. शिकवणी संपल्यानंतर ती सायकलने घरी जात होती. राजने तिला रस्त्यात अडविले आणि फिरायला चल असे म्हटले. मुलीने नकार देताच तू मला ओळखत नाही. तू माझ्यासोबत फिरायला आली नाही तर असे बोलून अश्लिल हावभाव केला. त्याचप्रमाणे मुलीला जिवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी वाठोडा पोलिसांनी विनयभंगाचा गुन्हा नोंदवून राजला अटक केली.

## मुंबईचा महापौर 'दिल्ली ठरवणार'

### भाजपची ठाम भूमिका; युतीतील सामंजस्य राखत फडणवीसांची तारेवरची कसरत

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २०**

मुंबई महानगरपालिकेतील महापौरपदाचा पेच आता शहराच्या चौकटीबाहेर जाऊन थेट राजधानी दिल्लीपर्यंत पोहोचला आहे. ''मुंबईत महापौर भाजपचाच'' अशी ठाम भूमिका भाजपच्या दिल्लीतील नेतृत्वाने घेतल्याचे संकेत मिळत असून, हा संदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत पोहोचल्याची माहिती सूत्रांकडून समजते. त्यामुळे महायुतीतील सत्तासमायोजनाची कसरत अधिकच अवघड झाली आहे.

मुंबई महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षशिवसेना महायुतीला बहुमत मिळाले असले, तरी निकालानंतर लगेचच महापौरपदावरून मतभेदांची ठिणगी पडली. भाजपने ८९ जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष ठरण्याची बाजी मारली, तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला २९ जागा मिळाल्या. बहुमताचा ११४ चा आकडा गाठण्यासाठी परस्परांवर अवलंबून असतानाच, सत्तावाटपाच्या मुद्द्यावर तणाव वाढत चालला आहे.

शिवसेनेकडून अडीच वर्षांचे महापौरपद, तसेच स्थायी समितीसह इतर महत्त्वाच्या समित्यांमध्ये निर्णायक वाटा मागितला जात असल्याची चर्चा आहे. दुसरीकडे, ''सर्वाधिक जागा जिंकणारा पक्ष म्हणून महापौरपदावर आमचाच हक्क'' या भूमिकेवर भाजप ठाम असल्याचे चित्र आहे. परिणामी, महापौरपदाचा प्रश्न हा केवळ पदाचा न राहता प्रतिष्ठा, सत्तेचा समतोल आणि युतीची शिस्त यांचा कस लावणारा ठरला आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस दावोस दौऱ्यावर असल्याने प्रत्यक्ष चर्चा रखडल्या असल्या, तरी दिल्लीहून आलेल्या संदेशामुळे राजकीय हालचालींना वेग आला आहे. ''मित्रपक्षांसमोर भूमिका ठाम ठेवा; पण युतीचे धागे तुटणार नाहीत याची खबरदारी घ्या'' असा समतोलाचा सूर दिल्लीतील नेतृत्वाकडून व्यक्त झाल्याची माहिती आहे. त्यामुळे फडणवीससमोर आता ठामपणा आणि सलोखा यांचा तोल सांभाळण्याची खरी कसोटी उभी ठाकली आहे.

हा पेच सोडवण्यासाठी दिल्लीमध्ये महत्त्वाची बैठक होण्याची चिन्हे आहेत. शिवसेनेचे नेते राहुल शेवाळे आणि भाजपचे नेते अमित साटम यांच्यातील चर्चेत महापौरपदासोबतच स्थायी समितीवरील वर्चस्व आणि सत्तेची एकूण मांडणी यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न होणार असल्याचे सांगितले जाते.

एकीकडे मुंबईच्या सत्ताकिल्ल्यावर आपला दावा ठसवणारी भाजपची ठाम भूमिका, तर दुसरीकडे सत्तेत न्याय्य वाटा मागणारी शिवसेनाया संघर्षामुळे ''मुंबईचा महापौर नेमका कोण?'' हा प्रश्न अधिकच चुरशीचा बनला आहे.

## मंदिरात चोरी करणाऱ्यास अटक

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २०**

तहसील आणि पाचपावली हद्दीत दोन ठिकाणी मंदिरात चोरी करणाऱ्या सुभाष सुखदेव झाडे (५३) टेलिफोन एक्सचेंज चौक यास गुन्हे शाखा युनिट ६ च्या पथकाने अटक केली.

तहसील हद्दीत टिमकी येथे श्री संकटमोचन हनुमान मंदिर आहे. १५ जानेवारी रोजी सायंकाळी ६ ते ६.३० च्या सुमारास अज्ञात चोरांनी मंदिराच्या उघड्या दारातून आत प्रवेश केला आणि हनुमानाच्या मूर्तीवरील २५० ग्रॅम वजनाचा चांदीचा टिळा चोरून नेला होता. याप्रकरणी तहसील पोलिसांनी चोरीचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला होता. पोलिसांनी त्या परिसरातील सीसी फुटेज तपासले असता त्यात सुभाष हा मंदिरात जाताना दिसून आला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याची विचारपूस केली असता त्याने पाचपावली हद्दीतील तांडापेठ परिसरातील हनुमान मंदिरात चोरी केल्याची कबुली दिली. त्यावरून पोलिसांनी त्याला अटक केली.

## ठाकरे बंधूंचा एकत्र रणशिंग!

### बाळासाहेबांच्या जयंतीनिमित्त २३ जानेवारीला एकाच व्यासपीठावर

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २०**

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीनंतर महाराष्ट्राच्या राजकारणात जणू शांतता नांदत असल्याचा भास होत असतानाच, ठाकरे घराण्यातून पुन्हा एकदा सत्ताकारणाची तोफ धडाडण्याची चिन्हे स्पष्ट झाली आहेत. निमित्त आहे बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीचे. आणि केंद्रस्थानी आहेत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे.



महापालिका निवडणूक निकालानंतर पहिल्यांदाच ठाकरे बंधू एकाच कार्यक्रमात, एकाच व्यासपीठावर दिसणार आहेत. २३ जानेवारी रोजी मुंबईतील षण्मुखानंद सभागृहात हा विशेष सोहळा रंगणार असून, याची चर्चा सध्या राज्याच्या राजकीय वर्तुळात वणव्यासारखी पसरली आहे.

हा कार्यक्रम केवळ स्मृतिदिनापुरता मर्यादित नाही. बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित करण्यात येणारा हा विशेष सोहळा ठाकरे गटाची शिवसेना आणि मनसे संयुक्तपणे करणार आहेत. हीच बाब या कार्यक्रमाला वेगळं राजकीय वजन देणारी ठरते आहे.

खासदार संजय राऊत यांनी या कार्यक्रमाची माहिती देताना स्पष्ट संकेत दिले ''हा कार्यक्रम केवळ आठवणींचा नाही, तर विचारांचा आहे.'' मात्र राजकारणात 'विचार' म्हणजेच 'दिशा' असते, हे वेगळं सांगायला नको.

मराठी अस्मिता, मुंबई आणि भाषेच्या मुद्द्यावरून राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे तब्बल दोन दशकांनंतर एकत्र आले होते. जुलै २०२५ मध्ये हिंदी सक्तीच्या निर्णयाविरोधात दोघे एकाच व्यासपीठावर दिसले. त्यानंतर महापालिकेच्या निवडणूक प्रचारात शिवाजी पार्कवर झालेल्या संयुक्त सभेने राजकीय समीकरणांना कलाटणी दिली.

आता निवडणुका संपल्या, निकाल लागले, पण ठाकरे बंधूंचं एकत्र येणं थांबलेलं नाही उलट अधिक ठळक होत चाललं आहे. आणि यामुळेच राजकीय विश्लेषकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

बाळासाहेब ठाकरे यांची जयंती हा जरी भावनिक विषय असला, तरी या एकत्र येण्यामागे राजकीय रणनीती नसतील, असं मानणं भोळेपणाचं ठरेल. मुंबई महापालिकेपासून ते राज्याच्या सत्तेपर्यंत ठाकरे बंधूंचं एकत्र येणं म्हणजे सत्ताधाऱ्यांसाठी धोक्याची घंटा आहे. विशेषतः मराठी मतदार, मुंबईतील अस्मितेचा मुद्दा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सत्ता यावर दोघांची संयुक्त भूमिका काय असणार, याकडे सध्या साऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## शालार्थ घोटाळाप्रकरणात गोंदिया येथून तिघांना अटक

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २०**

शालार्थ आयडी घोटाळाप्रकरणात गोंदिया येथून तीन शिक्षकांना अटक करण्यात आली असून आतापर्यंत या घोटाळ्यात २० जणांना अटक करण्यात आली आहे.

दिलेशकुमार छबीलाल कटरे (४४) मॉडेल कॉनव्हेंटजवळ, वार्ड २, गोरेगाव (गोंदिया), रूपाली बिहारीलाल रहांगडाले (४०) चंद्रभागा नाका, तिरोडा आणि भाऊराव मधुकर मालधे (५६) ऑफिसर कॉलनी, वीर सावरकर वार्ड, तिरोडा अशी अटक करण्यात आलेल्या शिक्षकांची नावे आहेत.

या प्रकरणातील अटक आरोपी मुख्याध्यापक पराग नानाजी पुडके (३३) रा. शारजा भवन, खेडेपार रोड, लाखनी याची ओंकार मल्टीपरपज एज्युकेशन सोसायटी होती. या सोसायटीची यादवनगर येथे एसकेबी उच्च प्राथमिक शाळा आहे. पुडके याने शाळेच्या नावाने बनावट सही व शिक्के मारून शिक्षक पदाचे बनावट अनुभव प्रमाणपत्र तयार केले. वास्तविक पाहता पुडके हा शाळेच्या आस्थापनेवर कधीही नव्हता. तसेच कधीही तो शाळेत गेला नव्हता. तरीही त्याने बनावट अनुभव प्रमाणपत्रावर मुख्याध्यापकाची खोटी सही करून शालार्थ आयडी मिळविण्याचा प्रयत्न केला. हा आयडी प्रस्ताव रद्द करण्यासाठी शिक्षण विभागाचे उपसंचालक उल्हास नरड यास कळविले असता प्रस्ताव रद्द न करता उलट पुडके यास मदत केली आणि त्याला शालार्थ आयडी मिळवून दिला. पुडकेने सहायक शिक्षक ते मुख्याध्यापक पदासाठी लागणारी सर्व शासकीय मान्यता आदेश मिळवून दिले. पुडके आणि नरड यांनी बनावट दस्तावेजाद्वारे शासनाचा निधी लाटून कोट्यवधी रुपयांनी फसवणूक केली. याप्रकरणी सदर पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा नोंदवून १७ जणांना अटक केली होती.

तपासात ठाणेगाव, ता. तिरोडा (जि. गोंदिया) येथील सिद्धार्थ हायस्कूल ॲण्ड ज्युनियर कॉलेज आर्ट ॲण्ड सायन्स येथील शिक्षक दिनेशकुमार कटरे, रूपाली रहांगडाले आणि भाऊराव मालधे यांनाही बोगड आयडी मिळवून दिल्याचे निष्पन्न झाले. त्या अनुषंगाने काल सोमवारी तिघांनाही अटक करण्यात आली. तिघांचीही पोलिस कोठडी घेण्यात आली. याप्रकरणात आणखी काही आरोपींचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले असून लवकरच त्यांनाही अटक करण्यात येणार असल्याचे पो. नि. अमोल देशमुख यांनी सांगितले.

## ईव्ही वॉलेट रिचार्जमुळे दळणवळण क्षेत्राला बळ

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २०**



नॅशनल पेमेंट्स कार्पोरेशन ऑफ इंडियाची उपकंपनी असलेली एनपीसीआय भारत बिलपे लि. भारत कनेक्टवरील ईव्ही रिचार्ज श्रेणीच्या माध्यमातून भारतातील इलेक्ट्रीक वाहन परिसंस्थेसाठी डिजीटल पेमेंट सुविधा अधिक मजबूत करीत आहेत. ग्लोबल फिनटेक फेस्ट २०२५ दरम्यान सुरू करण्यात आलेल्या या नव्या श्रेणीमुळे इलेक्ट्रीक वाहन मालकांना भारत कनेक्ट सक्षम टच पॉईंट्सद्वारे ईव्ही वॉलेट्समध्ये सहजपणे रिचार्ज करता येणार आहे.

निती आयोगाच्या अहवालानुसार, भारतात ईव्हीची विक्री २०१६ मध्ये ५० हजार होती. २०२४ पर्यंत २.०८ दशलक्षपर्यंत वाढली आहे. २०३० पर्यंत विकल्या जाणाऱ्या वाहनांपैकी ३० टक्के हिस्सा इलेक्ट्रीक वाहनांचा करण्याचे उद्दिष्ट भारताने ठेवले आहे. ईव्ही वाहनांची वाढती मागणी लक्षात घेता ग्राहकांना दीर्घकाळ विखुरलेल्या प्लॅटफॉर्मचा आधार घ्यावा लागतो किंवा चार्जिंग करण्यासाठी ऑपरेटर ॲप्समध्ये बदल करावा लागला. त्यामुळे ग्राहकांची गैरसोय होते. ही समस्या लक्षात घेता प्रमुख ईव्ही वॉलेट पुरवठादार आणि चार्जिंग नेटवर्क्स एका चौकटीत समाविष्ट करण्यात आली. एनबीबीएल ईव्ही ग्राहकांसाठी त्रासमुक्त पेमेंट्स सुविधा उभारून ईव्ही क्षेत्राच्या वाढीस पाठबळ देत आहे.

## काशीत बुलडोझर, महाराष्ट्रात संताप!

### अहिल्याबाई होळकर व धनगर समाजाचा अपमान

### नाना पटोलेंचा मोदी-योगींवर घणाघात

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २०**

''हिंदुत्वाचे रक्षक असल्याचा दावा करणाऱ्या सत्ताधाऱ्यांनीच हिंदू अस्मितेवर घाव घातला आहे,'' अशा शब्दांत काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. काशीतील पवित्र मणिकर्णिका घाट उद्ध्वस्त केल्याचा आरोप करत पटोले यांनी याला राजमाता अहिल्याबाई होळकर यांचा, तसेच संपूर्ण धनगर समाजाचा अपमान ठरवले आहे.

''विकासाच्या नावाखाली हिंदुंच्या श्रद्धास्थानांवर बुलडोझर चालवण्याचा अधिकार मोदीयोगींना कोणी दिला? त्यांनी जाहीर माफी मागावी,'' अशी थेट मागणीही पटोलेंनी केली.

माध्यमांशी बोलताना पटोले म्हणाले की, काशी हे केवळ भौगोलिक शहर नसून हिंदू धर्मासाठी अत्यंत पवित्र आणि मानाचे आध्यात्मिक केंद्र आहे. ''पंतप्रधान नरेंद्र मोदी याच काशीतून तीन वेळा निवडून आले. पण काशीच्या विकासाच्या नावाखाली शेकडो मंदिरे तोडली गेली आणि आता अहिल्याबाई होळकर यांनी बांधलेला पवित्र मणिकर्णिका घाट उद्ध्वस्त केला गेला,'' असा गंभीर आरोप त्यांनी केला.



राजमाता अहिल्याबाई होळकर यांनी न्याय, धर्म आणि लोककल्याणाच्या आधारावर राज्य कारभार केला. काशी विश्वनाथ, सोमनाथ यांसारख्या अनेक मंदिरांची त्यांनी पुनर्बांधणी केली. ''अशा थोर व्यक्तिमत्त्वाशी निगडित स्थळ उद्ध्वस्त करणे म्हणजे हिंदू धर्माच्या इतिहासावरच हल्ला आहे,'' असे पटोले म्हणाले.

पटोले यांनी मणिकर्णिका घाटाचे धार्मिक महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, ''या घाटावर अंत्यसंस्कार केल्याने आत्म्याला थेट मोक्ष मिळतो, अशी हिंदू धर्मातील धारणा आहे. हा घाट ५१ शक्तीपीठांपैकी एक मानला जातो. अशा पवित्र स्थळी बुलडोझर चालवणे हा हिंदू समाजाचा घोर अपमान आहे.'' याहून गंभीर बाब म्हणजे, ''काहीच घडले नाही, दाखवले जाणारे दृश्य एआय आहे,'' असा दावा योगी आदित्यनाथ सरकारकडून केला जात असल्याचा आरोप करत पटोले यांनी संताप व्यक्त केला.

## भागीदाराला एक कोटींनी गंडविले

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २०**

प्रॉपर्टी खरेदी विक्रीच्या प्रकरणात भागीदाराची एक कोटीची फसवणूक केल्याप्रकरणी गिट्टीखदान पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

काटोल मार्गावरील जागृती कॉलनी येथे राहणाऱ्या शमी कन्हैयालाल ममतानी (५५) यांची २०११ मध्ये आरोपी अनुप शाम करनानी (५७) सांताक्रूझ (पश्चिम), मुंबई याच्याशी ओळख झाली होती. दोघांनीही मिळून प्रॉपर्टी खरेदी विक्रीचे काम सुरू केले होते. त्यामुळे ममतानी यांचा करनानीवर विश्वास बसला होता. १५ डिसेंबर २०११ ते १४ फेब्रुवारी २०१३ दरम्यान करतानी याने मे. अंबिका कोलोनायझर एलएलपी कंपनीत प्रॉपर्टी खरेदी करण्यासाठी ममतानी यांना भाग पडले. त्यात ममतानी यांनी १ कोटी रुपये गुंतविले. ममतानी पैसे परत मागितले असता करनानी यांनी टाळाटाळ करीत ममतानी यांची फसवणूक केली. याप्रकरणी गिट्टीखदान पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

## राजनगरात तीन कोटींची घरफोडी

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २०**

शिर्के ले आऊट, राजनगर येथे राहणाऱ्या एका पेट्रोल व्यावसायिकाकडे धाडसी घरफोडी करून अज्ञात चोराने हिरजडीत दागिने आणि रोख ६५ लाख रुपये असा २ कोटी ९१ लाख ५० हजाराचा ऐवज चोरून नेल्याची घटना उघडकीस आली. या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली असून पोलिसांच्या पॅट्रोलिंगवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाला आहे.

बलजिंदरसिंग इंद्रजीतसिंग नय्यर (५६) असे या व्यावसायिकाचे नाव आहे. नय्यर यांचा राजनगरात प्रशस्त असा बंगला असून शहरात अनेक ठिकाणी पेट्रोलपंप आहेत. सोमवारी रात्री नय्यर यांच्या लहान मुलाच्या साक्षगंधाचा कार्यक्रम कळमेश्वर येथील रिसॉर्टमध्ये आयोजित केला होता. रात्री ८ च्या सुमारास नय्यर यांनी आपले घर कुलूपबंद केले आणि कुटुंबिय व नातेवाईकासह साक्षगंधाच्या कार्यक्रमाला गेले होते. मध्यरात्री अज्ञात चोराने स्वयंपाक खोलीला लावलेली लोखंडी खिडकीची जाळी कापली आणि आवारात प्रवेश केला. चोरट्याने दार तोडून घरात प्रवेश केला. कपाटाच्या वर लॉकरची चावी होती. चोरट्याने लॉकर उघडले. लॉकरमध्ये



२ कोटी ४७ लाखांचे अडिच किलो सोन्याचे दागिने, १ कोटीचे हिरेजडीत दागिने, रोख ६५ लाख रुपये असा तीन कोटीचा ऐवज चोरून चोरटा पसार झाला. साक्षगंधाचा कार्यक्रम आटोपून नय्यर कुटुंबिय घरी आले असता ही घटना उघडकीस आली. लगेच सदर पोलिसांना ही माहिती देण्यात आली.

घरफोडीची माहिती मिळताच सहपोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, अप्पर पोलिस आयुक्त (गुन्हे) बसंत परदेशी, पोलिस उपायुक्त राहुल माकणीकर, परिमंडख २ चे पोलिस उपायुक्त नित्यानंद झा, सदरचे पो. नि. अमोल देशमुख आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. त्याचप्रमाणे श्वानपथक आणि ठसे तज्ज्ञांना देखील घटनास्थळी पाचारण करण्यात आले.

पोलिसांनी आजूबाजूला असलेल्या परिसरातील सीसी फुटेज चेक केले असता एक चोरटा त्या परिसरात फिरताना दिसून आला. याप्रकरणी सदर पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

## अरुणावती नदी पुलावर लोखंडी कठडे बसवा : परवेज बेग

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, आर्णी, दि. २० जानेवारी



आर्णीचे सर्वधर्म समभावाचे प्रतीक बाबा कंबलपोष दरगाह शरीफ ला जाणारा अरुणावती नदी वरील मुख्य पुलाचे लोखंडी संरक्षक कठडे पावसाळ्यात पुरामुळे वाहून गेल्याने पुलावर अपघाताची शक्यता आहे व यात्राही उर्सजवळ आहे त्यामुळे येथील संरक्षक कठडे बसविण्यात यावे अशी मागणी आर्णी येथील सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार परवेज बेग यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग आर्णीचे उप अभियंता यांचेकडे लेखी निवेदनातून केली आहे. लवकरचं कठडे बसविण्यात येतील असे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता पांडे यांनी दिल्याची माहिती आहे

युवाराष्ट्र दर्शन

-: कार्यालयीन पत्ता :-
गुरूमाऊली सोसायटी, दाते कॉलेज रोड, जुना उमरसरा, यवतमाळ ४४५००१

-: जिल्हा प्रतिनिधी :-
संजय सावरकर मो. ९४२१८४४८७०

* एजन्सीसाठी संपर्क

ई-मेल ssawarkar43@gmail.com

## संक्षिप्त

### वाहनाच्या धडकेत पादचारी जखमी

•युवाराष्ट्र दर्शनयवतमाळ
शहरातील संविधान चौक ते नेताजी भवन रोडवर एका अज्ञात वाहन चालकाने पादचा-याला धडक देऊन जखमी केल्याची घटना घडली आहे. फिर्यादी गणेश रमेश राऊत (३६, रा. घाटंजी) हे १८ जानेवारी २०२६ रोजी रात्री ८:०० वाजेच्या सुमारास राहुल पानटपरी जवळून पायी जात असताना हा अपघात झाला. अज्ञात चालकाने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून फिर्यादीस जोराची धडक दिली, ज्यामध्ये ते जखमी झाले. याप्रकरणी यवतमाळ शहर पोलिसांनी अज्ञात चालकाविरुद्ध कलम २८१, १२५(ब) भान्यास अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### तरुणाला मारहाण

•युवाराष्ट्र दर्शन दारव्हा:
येथील किल्ला वॉर्ड परिसरात दारू पिण्यासाठी पैसे दिले नाहीत या कारणावरून एका तरुणाला बेदम मारहाण करण्यात आली आहे. फिर्यादी हासीन खान मुस्लिम खान (२२) याला आरोपी नवाब खान (२७) आणि नासीर खान (३५) यांनी १८ जानेवारी रोजी सकाळी गाठले. फिर्यादीने पैसे देण्यास नकार देताच आरोपींनी त्याच्याशी वाद घालून शिवीगाळ केली आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या हल्ल्यात फिर्यादीच्या डाव्या डोळ्याच्या वर गंभीर दुखापत झाली आहे. दारव्हा पोलिसांनी या दोन्ही आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे.

### मद्यधुंद चालकाचा राडा...

•युवाराष्ट्र दर्शन दिग्रस:
एका मद्यधुंद वाहन चालकाने अपघातानंतर पोलिसांनाच धमकावून शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. आरोपी अश्विन रामभाऊ राऊत याने मद्यधुंद अवस्थेत आपली कार निष्काळजीपणे चालवून दुसऱ्या एका वाहनास धडक दिली. पोलीस कॉन्स्टेबल सुनील जाधव घटनास्थळी पोहोचले असता, आरोपीने त्यांची कॉलर पकडून 'तुला पाहून घेईन, मला नेणारा तू कोण?' अशी धमकी दिली. तसेच पोलिसांना शिवीगाळ करत सस्पेंड करण्याची धमकी दिली. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले आहे.

### मोटारसायकल चोरी

•युवाराष्ट्र दर्शन लाडखेड:
लाडखेड पोलीस स्टेशनच्या हद्दीतील मौजा तीवसा येथून एक महागडी मोटारसायकल चोरीला गेल्याची घटना घडली आहे. फिर्यादी भूषण रामेश्वर मुंदे (३२, रा. चाकोरा) यांची एम एच-२७ ए.डी. ०८९५ क्रमांकाची मोटारसायकल, जिची किंमत साधारण ९०,००० रुपये आहे, अज्ञात चोरट्याने पळवून नेली. ही घटना १९ डिसेंबर २०२५ रोजी घडली होती, ज्याची तक्रार १९ जानेवारी २०२६ रोजी दाखल करण्यात आली आहे. पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध कलम ३०३(२) भान्यास अन्वये गुन्हा नोंदवून तपासाला सुरुवात केली

## नगरपंचायतच्या विषय समित्या जाहीर

### 'स्थायी'च्या सभापतीपदी नगराध्यक्षा अर्चनाताई वासमवार : सर्वसमावेशक कार्यकारिणीवर शिक्कामोर्तब

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
ढाणकी, दि. २० जानेवारी

ढाणकी नगरपंचायतमध्ये सन २०२६ या वर्षासाठी विविध विषय समित्यांच्या सभापतींची निवड प्रक्रिया नुकतीच पार पडली. या निवडीनंतर नगरपंचायतची अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी 'स्थायी समिती' गठीत करण्यात आली असून, यामध्ये अनुभवी आणि नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे. या नव्या कार्यकारिणीमुळे शहराच्या प्रलंबित विकासकामांना आता मोठी गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

नगरपंचायतच्या नियमानुसार नगराध्यक्षा या स्थायी समितीच्या पदसिद्ध सभापती असतात. त्यानुसार नूतन समिती खालीलप्रमाणे गठीत झाली: सभापती: सौ. अर्चना सुंदरकांता वासमवार (नगराध्यक्षा)







सदस्य: दत्तदिगांबर श्रीकृष्ण वानखेडे उपनगराध्यक्ष, शायदाबी शेख मिरांजी, यास्मीन अख्तर मुनव्वर, सौ. दुर्गा साईनाथ मंतेवाड विविध विभागांच्या माध्यमातून शहराचा विकास साधण्यासाठी सभापतींची निवड करण्यात आली आहे:

सार्वजनिक बांधकाम सभापतीपदी शायदाबी शेख मिरांजी यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.

स्वच्छता व सार्वजनिक आरोग्य सभापतीपदी उपनगराध्यक्ष दत्तदिगांबर श्रीकृष्ण वानखेडे सांभाळतील. पाणी पुरवठा व जलनिस्सारण सभापतीपदी यास्मीन अख्तर मुनव्वर यांची वर्णी लागली आहे.

महिला व बालकल्याण समिती सभापतीपदी सौ. दुर्गा साईनाथ मंतेवाड तर उपसभापतीपदी नफीसाबी इम्रान शेख यांची निवड झाली आहे.

समिती गठीत करतेवेळी नगरसेवक प्रफुल चौरे, उमेश योगेवार, मल्हार चंद्रे, देव निमलवाड, रविशंकर ढोबळे, नागेश रातोळे, सौ. सारिका विनोद कांबळे, बीबी हाजरा शेख एजाज, रोहिणी गोटलेवाड, शेख फरजानाबी शादुल उपस्थित होते. तसेच मार्गदर्शक म्हणून स्वीकृत नगरसेवक रोहित वर्मा व संजय सलेवाड यांच्यासह नगरपंचायतचे मुख्याधिकारी डॉ. अजय कुराडे यांची प्रमुख उपस्थिती निवड पार करण्यात आली या निवडीनंतर नवनियुक्त सभापतींचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे

## दारव्हा नगर परिषद विषय समित्यांच्या सभापतींची निवड









•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी,
दारव्हा, दि. २० जानेवारी

नगरपालिकेत मंगळवारी (दि. २०) विषय समित्यांच्या सभापतीची निवड पार पडली. दारव्हा नगर परिषद पाचही सभापतींची अविरोध निवड पार पडली. दारव्हा नगर परिषदेच्या उपाध्यक्ष पदाच्या निवडीनंतर मंगळवारी पाच विषय समितीच्या सभापतींची निवड करण्यात आली. यासाठी प्रत्येक विषय समितीसाठी प्रत्येकी एकमेव अर्ज असल्याने ही निवडणूक प्रक्रिया बिनविरोध पार पडली.

यामध्ये महिला व बालकल्याण सभापतीपदी सिमा गजेंद्र चव्हाण, बांधकाम सभापतीपदी प्रकाश दुधे, आरोग्य सभापतीपदी एकनाथ माहूरकर,पाणीपुरवठा सभापती दिपा मनोज सिंगी, शिक्षण सभापतीपदी वैशाली खाटीक यांची तर महिला व बाल कल्याण उप सभापती पदी समाजवादी पार्टी च्या जमीला चौधरी अविरोध निवड करण्यात आली. सदर निवडणूक प्रक्रियेसाठी नगराध्यक्ष सुनील चिरडे उपस्थित होते. सदर निवडणूक प्रक्रियेकरीता पिठासीन अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी विजय सुर्यवंशी यांनी काम पाहिले. तर सहाय्यक पिठासीन अधिकारी म्हणून दारव्हा नगर परिषदेचे मुख्याधिकारी विठ्ठल केदारे यांनी काम पहिले. सदर निवडणूक कार्यक्रमास सर्व नगरसेवक व नगर परिषद कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान, सभापती पदांची निवड बिनविरोध झाल्याचे जाहीर होताच समर्थकांनी आनंदोत्सव साजरा केला.



ढाणकी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील महाराष्ट्रामध्ये सत्ता महानगरपालिकेची भारतीय जनता पार्टी सत्ता आल्यामुळे माजी नगराध्यक्ष सुरेशलाला जयस्वाल आम्ही महाराष्ट्रामध्ये महानगरपालिकेमध्ये भगवा लहर होती भगवा फडकला आहे दिली ते गल्ली पर्यत भारतीय जनता पार्टी सत्ता आली आहे छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे फटाके फोडून उत्सव साजरा केला भारतीय जनता पार्टी नगरसेवक व पद अधिकारी जल्लोष साजरा केला (युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी शेख इरफान)

## ८६ लाख बहिणींच्या ओवाळणीला केवायसीचे ग्रहण

### सरकारचे तांत्रिक 'प्रेम' उघड, बोगस ऑनलाइन सेंटरवर कारवाईची मागणी

•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ/
प्रतिनिधी, दि. २० जानेवारी

विधानसभेच्या निवडणुका पार पडताच 'लाडक्या बहिणीं'चा पुळका ओसरल्याचे विदारक चित्र महाराष्ट्रात पाहायला मिळत आहे. ज्या बहिणींच्या नावाने निवडणुकीत मते मागितली, त्याच सुमारे ८६ लाख महिलांना आता 'केवायसी' आणि 'तांत्रिक बिघाड' या नावाखाली योजनेतून पद्धतशीरपणे बाहेर फेकले आहे. प्रशासनाच्या या 'अद्वितीय' तांत्रिक कौशल्यामुळे गेल्या तीन महिन्यांपासून सुमारे ८६ लाख घरांची ओवाळणी रोखली गेली असून, हे सरकारचे बहिणींवरचे प्रेम आहे की निवडणुकीनंतरचा परतावा? असा झोंबणारा सवाल आता विचारला जात आहे.



योजनेची अंमलबजावणी करतांना सरकारने दाखवलेला उतावळेपणा आता महिलांच्या जिवावर उठला आहे. ऑनलाईन सेंटर चालकांना कोणतेही प्रशिक्षण न देता त्यांच्या हातात लाखो महिलांचे भवितव्य सोपवण्यात आले. परिणामी, "आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय" या म्हणीप्रमाणे प्रशासनाचा कारभार सुरू आहे. अनेक महिलांचे अर्ज पात्र असूनही केवळ सर्व्हर आणि तांत्रिक त्रुटींमुळे लटकले आहेत. हिवरा (संगम) येथील सामाजिक कार्यकर्त्या तथा माजी ग्रामपंचायत सदस्य सौ. राधाबाई कामारकर यांनी थेट मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या उच्चाधिकार समितीचे अध्यक्ष व सचिवांना पत्र लिहून या तांत्रिक 'खेळा'चा बुरखा फाडला आहे.

केवायसी (KYC) करण्याच्या नावाखाली ग्रामीण भागात महिलांची मोठी आर्थिक लूट सुरू आहे. विशेष म्हणजे, केवायसी केल्यावर महिलांना कोणतीही अधिकृत पावती किंवा डिजिटल पुरावा दिला जात नाही. बायोमेट्रिक अंगठा लावूनही पैसे येत नसल्याने महिला संभ्रमात आहेत. या पारदर्शकतेच्या अभावामुळे बोगस ऑनलाईन केंद्र चालकांचे फावले असून, सरकार मात्र या लुटमारीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप पत्रात करण्यात आला आहे.महिला सक्षमीकरणाच्या बाता मारणारे सरकार ८६ लाख महिलांना जिल्हाधिकारी आणि तहसील कार्यालयांच्या चकरा मारायला लावत आहे. गेल्या तीन महिन्यांचा हप्ता अडकवून सरकारने बहिणींच्या विश्वासाला तडा दिला आहे. "ज्या हातांनी मतदानाचा बटन दाबला, तेच हात आता हक्काच्या पैशांसाठी रिकामे आहेत," अशी संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे. तांत्रिक चुका सुधरवण्यासाठी गावोगावी शिबिरे लावण्याऐवजी महिलांना वाऱ्यावर सोडले गेले आहे. प्रशासनाने तात्काळ या ८६ लाख महिलांचे थकीत हप्ते व्याजासह जमा करावेत आणि दोषी ऑनलाईन केंद्रांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी आक्रमक मागणी सौ. राधाबाई कामारकर यांनी केली आहे.

## वधू-वर परिचय मेळावा काळाची गरज : आ. बाळासाहेब मांगुळकर

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी,
यवतमाळ, दि. २० जानेवारी

तेली समाज विवाह व सांस्कृतिक मंडळ, यवतमाळ व्दारा आयोजित 38 वा तेली समाज उपवधु-वर व पालकांचा परिचय मेळावा व शुभमंगलम् परिचय पुस्तीका प्रकाशन रविवार दि. 18 जानेवारी रोजी संताजी मंदिर, संकट मोचन रोड च्या प्रांगणात प्रतिभावान उपवर-वधू यांनी दिलेल्या परिचयाने व हजारो समान बांधवाच्या उपस्थितीत संपन्न झाला. या मेळाव्याला संपूर्ण महाराष्ट्रातून समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. मेळाव्याच्या माध्यमातून सर्व तेली समाजाच्या शाखा एकत्रीत येत आहे. परिचय मेळाव्यामुळे समाजाला अनेक फायदे होत आहे. समाजच्या मुला-मुलीना




व्यासपीठ उपलब्ध करुन दिल्याने समाजाच्या मुला-मुलींना त्याची प्रतिभा दाखविण्याची संधी मिळत असून योग्य जोडीदार मिळण्याकरिता संधी प्राप्त होत आहे अशी माहिती कार्यक्रमाचे अध्यक्ष महेश ढोले, अध्यक्ष तेली समाज, विवाह व सांस्कृतिक मंडळ, यवतमाळ यांनी दिली. परिचय मेळाव्याच्या उद्घाटन प्रसंगी आमदार बाळासाहेब मांगुळकर म्हणाले की, या बदलत्या काळात उपवर-वधू परिचय मेळावा घेणे ही काळाची गरज आहे. त्या दृष्टीने समाज बांधवांना एकत्रित करण्याचे काम तेली समाज विवाह व सांस्कृतिक मंडळ करित आहे. तसेच कायक्रमाचे प्रमुख पाहूणे माजी खासदार रामदास तडस म्हणाले की, मंडळाचे कार्य उल्लेखनिय असून त्याला पुढे नेण्याचे कार्य महेश ढोले तसेच त्यांची चमू करित आहे. गजानन (नाना) शेलार, भूषण कडीले, शंकरराव हिंगासपूरे, संतोष ढवळे इत्यादी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शैलेश गुल्हाने, प्रभाकर सव्वालाखे, माधवी ढोले, डॉ. दिपक शिरभाते, वसंत शिरभाते, नागपूर, किशोर गुल्हाने, दिवाकर किन्हीकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते, कार्यक्रमाची सुरुवात आमदार बाळासाहेब मांगुळकर व मान्यवरांच्या हस्ते संताजी महाराजांचे पुजन व दिपप्रज्वलन करुन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दामोधर मोगरकर यांनी मागील 38 वर्षाचा मंडळाचा अहवाल सादर केला. उपस्थित सर्व उपवर मुला-मुलींनी आपला परिचय करुन दिला, त्यानंतर उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल साधनाताई काळे नगरसेविका, कविता शिले नगरसेविका, अमोल तंबाखे, अविनाश टाके, संजय सावरकर, विद्याताई राजेश चिंचोरे, अविनाश राजगुरे, देविदास देऊळकर, सुरेश अजमिरे, विद्याताई पोलादे, रत्नाकर पजगाडे, दामोधर मोगरकर, जितेंद्र हिंगासपूरे, सुरेश जयसिंगपुरे, अभिजित शिंदे, केदार शिरे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला, कार्यक्रमाचे सुत्र संचालन विद्याताई चिंचोरे, देविदास देऊळकर यांनी केले. हा विवाह मेळावा यशस्वी करण्याकरिता मंडळाचे सर्वश्री रामकृष्ण पजगाडे, मनोहरराव गुल्हाने, विद्याताई पोलादे, अशोकराव जयसिंगपूरे, प्रकाश मुडे, राजेश चिचोरे, उत्तमराव गुल्हाने, मुकुंदराव पोलादे, नंदकिशोर जिरापूरे, रामभाऊ ढोल, रश्मीताई गुल्हाने, बाळासाहेब शिंदे, अभिजित शिंदे, अजाब तंबाखे, सुनिल बिजवे, अजय किन्हेकर इत्यादींनी परिश्रम केले आहे.

## नंदादीप फॉउंडेशनच्या स्टॉलला भेट



•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी,
यवतमाळ, दि. २० जानेवारी

येथे १६ ते १९ जानेवारीला समता मैदान येथे रोटरी क्लब द्वारे एक्झिबेशन लावले असता अनेक व्यवसायिकांनी आपले दुकान लावून आपल्या वस्तूची जाहिरात केली येथे अनेक खाण्याच्या व्येजनाचे प्रकार होते परंतु ज्ञानेश्वर रायमल आणि काही मित्रांनी रोटरी मेळाव्यात फेरफटका मारला असता असे दोन स्टॉल येथे होते की एक नंदादीप फॉउंडेशन हे संदीप शिंदे व त्यांची पत्नी नंदिनी शिंदे हे दोघे पती पत्नी बेघर मनोरुग्णा करीता वंचिता साठी समर्पण केलेले असे व्यक्तीमत्व असलेले संदीप शिंदे यांची भेट होताच सर्वांना लाजवेल असे त्यांचे कार्याला माझा सलामच. संदीप शिंदे यांना सहकार्य नेहमी असतेच तेव्हा आज दिनांक १९ जानेवारीला त्यांच्या स्टॉलला भेट दिली असता माझ्या समवेत संताजी बीसी ग्रुपचे सदस्य वसंतराव ढोरे, मित्र सुभाष उघडे, संताजी बीसी ग्रुपचे सदस्य सुभाष हिवरे इत्यादींनी भेट दिली त्यांच्या कार्याला प्रोत्साहन देण्याकरीता रजिस्टरमध्ये नोंद केली.

## गोदावरी अर्बन पुसद शाखेचा हळदी-कुंकू सामाजिक उपक्रम

### "पर्यावरणपूरक संकल्पासोबत स्वच्छतेचा संदेश..." झाडांनंतर यंदा स्वच्छता कुंड्यांचे वाटप; नगराध्यक्ष मोहिणीताई नाईक यांच्या हस्ते उपक्रमाचा शुभारंभ..

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी,
पुसद, दि २० जानेवारी

गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी, नांदेड यांच्या पुसद शाखेच्या वतीने महिलांसाठी हळदी-कुंकूचा सामाजिक उपक्रम उत्साहात पार पडला. पहिल्याच वर्षी पर्यावरणाचा विचार करत हळदी-कुंकू कार्यक्रमात झाडांचे वाटप करून सामाजिक जाणीव जपणाऱ्या गोदावरी परिवाराने यंदाही त्या परंपरेला सातत्य दिले. यावर्षी पुसद शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्याच्या संकल्पात सहभागी होत महिलांना स्वच्छता कुंड्यांचे वाण देण्यात आले.



संस्थेचे संस्थापक ना.हेमंत पाटील, अध्यक्षा राजश्री पाटील, व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर, उप महाव्यवस्थापक सुरेखा दवे, सहायक महाव्यवस्थापक विजय शिर्मेवार, सहायक महाव्यवस्थापक रवि इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचा शुभारंभ नवनिर्वाचित नगराध्यक्ष ॲड. मोहिनी इंद्रनील नाईक यांच्या शुभहस्ते करण्यात आला.तसेच स्थानिक सल्लागार समिती महिला सदस्य डॉ. स्वाती वाट(दळवी) यांनी कार्यक्रमाची प्रस्तावित करत शहरातील सामाजिक राजकीय तसेच प्रतिष्ठित महिला वर्ग सौ.विजया असेगावकर, सौ कल्याणी पाठक, सौ अनुश्री पुरी, ॲड. जयश्री देशमुख, रेश्मा शिंदे (पत्रकार) सौ.वरदा पाटील, सौ वैष्णवी टेटर तथा स्थानिक सल्लागार समिती सदस्यांच्या कुटुंबातील महिला, बँकेच्या महिला कर्मचारी तसेच स्टाफच्या कुटुंबातील महिलांच्या उपस्थितीत हळदी-कुंकू व वाण देत हा सोहळा अतिशय आनंदोत्सवाच्या वातावरणात संपन्न झाला.

यावेळी पुसद शाखेचे वरिष्ठ व्यवस्थापक राहुल कोल्हे यांच्यासह उप व्यवस्थापक सुमित देवरे, सहाय्यक व्यवस्थापक अमोल व्हनराव, प्रफुल्ल रत्नपारखी, महेश बोरकर, नितीन जाधव, धनंजय देशमुख निखिल चौरे गजानन आगुर्डे सूरज भगत रोहिणी लंगडे पूजा बोंबले तसेच आदी आवर्त, दैनिक, प्रतिनिधी, कर्मचारी, खातेदार आदी उपस्थित होते.

पर्यावरण संवर्धनासोबतच स्वच्छतेचा संदेश देणारा हा उपक्रम पुसद शहरात विशेष चर्चेचा विषय ठरला असून गोदावरी अर्बनच्या सामाजिक जाणिवांचे पुन्हा एकदा दर्शन घडवणारा ठरला.




## श्री दत्त हॉस्पीटल ॲन्ड रिसर्च सेंटरतर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबिर

•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ |
प्रतिनिधी

बोरगाव ग्रामपंचायत येथे महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत तपासणी शिबिर रविवार १८ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आले होते.

यावेळी शिबिराचा १४८रुग्णांनी लाभ घेतला. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला. या शिबिरात डॉ. आशीष लढे, डॉ. मुक्ता भोसले, मुख्य समन्वयक सुधीर देशपांडे, तसेच हॉस्पीटलचे इतर कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला.

युवाराष्ट्र दर्शन
# गोंदिया जिल्हा
बुधवार, २१ जानेवारी २०२६

**वार्ताहर व एजेन्सी नियुक्ती करणे आहे**
मराठी लोकप्रिय दै. युवाराष्ट्र दर्शन करिता गोंदिया जिल्ह्यातील आमगाव, सालेकसा, देवरी, सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगाव, तिरोडा, गोंदिया क्षेत्रात वर्तमान पेपरच्या एजेन्सी व वार्ताहर करिता संपर्क साधा मो. ९५१८९३४०९६

**युवाराष्ट्र दर्शन, गोंदिया जिल्हा कार्यालय**
जिल्हा प्रतिनिधी मुकेश कुमार मिश्रा, कार्यालय पत्ता मनोहर चौक, गोविंदपूर रोड बग्गा कॉम्प्लेक्सच्या जवळ गोंदिया, ता. जि. गोंदिया बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क करा मो./व्हॉटअप नं. ९१७५२८३७४०

# गोंदिया–बालाघाट राष्ट्रीय महामार्गाचे काम संथ गतीने

## वृक्षधरा फाउंडेशनच्या शिष्टमंडळाची मंत्री गडकरी यांना निवेदन



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**गोंदिया :** गोंदिया-बालाघाट या राष्ट्रीय महामार्गाचे बांधकाम मागील अनेक वर्षापासून संथ गतीने सुरू आहे. तसेच निष्काळजी बांधकामामुळे नागरिकांसह प्रवास्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अपूर्ण बांधकामामुळे प्रवास्यांना जीव मुठीत घेवून प्रवास करावा लागत आहे. तेव्हा महामार्गाचे बांधकाम लवकरात लवकर करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक व पर्यावरणीय संस्था वृक्षधरा फाउंडेशनच्या शिष्टमंडळाच्या वतीने करण्यात आली आहे. तसेच या मागणीला घेवून केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेवून मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले आहे.

निवेदनात, राष्ट्रीय महामार्ग सध्या सोयीऐवजी नागरिकांसाठी गंभीर अडचणीचा विषय ठरत आहे. रस्त्याचे अनेक भाग अद्याप अपूर्ण असून अनेक ठिकाणी खोल खड्डे पडलेले आहेत. यामुळे दुचाकी व चारचाकी वाहनांचे अपघात वारंवार होत असून, रात्रीच्या वेळी परिस्थिती अधिकच धोकादायक बनते. धुळीमुळे वाढत आहेत आजार-बांधकामाच्या संथ गतीमुळे उडणाऱ्या धूळ-मातीचा फटका परिसरातील ग्रामीण व शहरी भागांना बसत आहे. दमा, ॲलर्जी व श्वसनविकारांचे प्रमाण वाढत असून, याचा सर्वाधिक परिणाम लहान मुले, महिला व ज्येष्ठ नागरिकांवर होत असल्याचे वृक्षधरा फाउंडेशनने निर्दशनास आणून दिले. वृक्षतोड झाली, रोपण नाही-रस्ता रुंदीकरणाच्या कामात १०० वर्षांहून अधिक जुने शेकडो वृक्ष तोडण्यात आले. मात्र नियमानुसार व प्रमाणानुसार देशी वृक्षांचे रोपण न केल्यामुळे पर्यावरणीय समतोल बिघडण्याचा धोका निर्माण झाला असल्याचा मुद्दाही शिष्टमंडळाने उपस्थित केला. दरम्यान मंत्री गडकरी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना गोंदिया-बालाघाट महामार्गाच्या प्रत्यक्ष स्थितीची तातडीने अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. तसेच कामाचा दर्जा राखून बांधकाम लवकर पूर्ण करणे, अपघातप्रवण ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात त्वरित सुधारणा करणे व तोडलेल्या वृक्षांच्या प्रमाणात देशी वृक्षांचे अनिवार्य रोपण करण्याचे स्पष्ट आदेश दिले. जनतेची सुरक्षितता, रस्त्याचा दर्जा व पर्यावरण संरक्षण याबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. या वेळी भाजप जिल्हाध्यक्ष सीता रहांगडाले, तनुज येडे, प्रमोद धुवारे व आयुष निधान उपस्थित होते.

# धान बोनस रखडल्याने शेतकऱ्यांत संताप



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**अर्जुनी मोरगाव :** तालुक्यातील धान उत्पादक शेतकरी सन २०२४-२५ च्या धान बोनसपासून वंचित ठेवण्यात आल्याने शेतकरी वर्गात तीव्र असंतोष पसरला आहे. शासनाने ठरवून दिलेल्या सर्व नियमांचे पालन करून धान विक्री करूनही बोनस रक्कम रोखून ठेवण्यात आल्याने शेतकऱ्यांवर अन्याय होत असल्याचा आरोप अन्नदाता धान उत्पादक शेतकरी संघाने केला आहे. दरम्यान येत्या १५ दिवसात मागण्यांची पुर्तता न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे. तसेच या संदर्भात जिल्हाधिकारी, जिल्हा पणन अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.

सविस्तर असे की, धान खरेदीच्या वेळी सर्व आवश्यक कागदपत्रांची तपासणी करण्यात आली होती. त्या वेळी कोणतीही हरकत नोंदवली नसताना, आता बोनस देताना '७/१२ नोंदीत तफावत' अशी कारणे पुढे करून बोनस रोखणे ही शेतकऱ्यांची उघडपणे पिळवणूक केली जात आहे. तालुक्यातील सर्व धान खरेदी केंद्रांवर धान विक्री केलेले सर्व पात्र शेतकरी, त्यात पट्टाधारक शेतकऱ्यांचाही समावेश आहे. तसेच धान विक्रीनंतरही काही शेतकऱ्यांच्या मूळ रक्कम अद्याप प्रलंबित असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. रब्बी हंगामाची लागवड, शेतीची तयारी व कुटुंबीयांचे दैनंदिन खर्च यासाठी पैसे उपलब्ध नसल्याने शेतकरी हतबल झाला असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. जर येत्या १५ दिवसात मागण्यांची पुर्तता न झाल्यास आंदोलनाचा इशारा निवेदनाच्या माध्यमातून देण्यात आला आहे. उपविभागीय अधिकारी ज्योती कांबळे तसेच तहसीलदार अनिरुद्ध कांबळे यांना निवेदन देतेवेळी ललित कुमार बाळबुद्धे, ब्रम्हदास मेश्राम, शेखर मेश्राम, सत्यवान कुंभरे, संतोष राऊत, रमेश कुंभरे, हेमराज बेलखोडे, चंद्रकुमार कावळे आदी उपस्थित होते.

# कोहळी समाज मंडळातर्फे हळदी-कुंकू कार्यक्रम



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**अर्जुनी मोरगाव :** कोहळी समाज मंडळ, नवेगावबांधच्या वतीने महिलांसाठी हळदीकुंकू व स्नेह मिलन कार्यक्रमाचे आयोजन १८ जानेवारी रोजी भागेरथाबाई आत्माराम डोंगरवार हायस्कूलचे सभागृहात करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ.डॉ.लता लांजेवार होत्या. तर उपाध्यक्ष म्हणून सौ.विजया कापगते, दीपप्रज्वलक म्हणून सौ.रुपलता कापगते यांनी उपस्थिती लावली. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून सौ.सुमनबाई डोंगरवार, सौ.पूजाताई कापगते, सौ.लताबाई कापगते, तसेच बिहारी डोंगरवार, घनश्याम कापगते, खुशाल डोंगरवार यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, माता सरस्वती व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. स्वागत गीत व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथींनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून स्त्रीशक्ती जागृत होणे आजच्या काळात का आवश्यक आहे, तसेच महिलांनी संघटित होऊन सामाजिक, शैक्षणिक व वैचारिकदृष्ट्या सक्षम होण्याची गरज यावर सखोल आणि प्रेरणादायी विचार मांडले. यानंतर उपस्थित सर्व भगिनींना हळदीकुंकू व वाण वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांसाठी अल्पोपहाराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ.शारदा नाकाडे यांनी केले. तर आभार प्रदर्शन सौ.सुनीता बोरकर यांनी केले.

# रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत मार्गदर्शन



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**अर्जुनी मोरगाव :** मनोहरभाई पटेल विज्ञान व कला कनिष्ठ महाविद्यालयात देवरी येथील राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत रस्ता सुरक्षा अभियान मार्गदर्शनाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य जी एम मेश्राम, प्रमुख मार्गदर्शक सहायक पोलिस निरीक्षक राजू बस्तवाडे गिरीधर बारसे, रामकृष्ण कापगते यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न पार पडले.

प्रत्येक व्यक्तींनी वाहन चालवताना रस्त्याच्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे, हेल्मेटचा वापर, सिटबेल्टचा वापर करूनच वाहन चालवून सुरक्षित राहावे असे आवाहन सर्व पालकांना केले. तसेच विना परवाना विद्यार्थ्यांनी वाहन चालवून स्वतःचे जीवनाशी खेळू नये असे आवाहन राजू बस्तवाडे यांनी आपल्या मनोगतातून केले. अशा या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी झंजाळ यांनी केले तर आभार रासेयो प्रमुख -जगदीश खेडकर यांनी मानले. व हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# अपघातात इसमाचा मृत्यू



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**तिरोडा :** तिरोडा-तुमसर मार्गावर विर्सीकडून तिरोडाला येत असलेल्या मुख्याध्यापकाचा मेंढा/बोदलकसा वळणावर झालेल्या अपघातात मृत्यू झाला. ही घटना आज (ता.२०) सायंकाळी ७ वाजता सुमारासची आहे. महिपाल रामा पारधी रा.खैरबोडी असे मृताचे नाव आहे. उभ्या वाहनावर दुचाकी धडकल्याने अपघात झाल्याची चर्चा आहे. या प्रकरणी पोलिसांनी तपासकार्य सुरू आहे. खैरबोडी येथील महिपाल पारधी हे खमारी जि.प.शाळेत मुख्याध्यापक पदावर कार्यरत होते. आज (ता.२०) स्वत:च्या दुचाकीने ते विर्सीकडून तिरोडा मार्गे खैरबोडीकडे येत होते. मेंढा/बोदलकसा वळणावर भीषण अपघात झाला. या अपघातात गंभीर जखमी झाल्याने महिपाल पारधी यांचा जागीच मृत्यू झाला. वळणावर उभ्या असलेल्या एका वाहनावर महिपाल पारधी यांची दुचाकी आदळल्याने अपघात झाल्याची परिसरात चर्चा आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंद केला असून मृतदेह उत्तरीय तपासणीकरीता उपजिल्हा रूग्णालयात पाठविण्यात आले आहे.

# नीलगायच्या धडकेत स्विफ्ट कारचे मोठे नुकसान



**गोंदिया ते कोहमारा मार्गा लगत डव्वा शेत शिवारात बांधावर तूर पिकाचे उत्पादन घेतले जाते. ह्या पिकावर वन्यप्राणी चाराई साठी मोठ्या प्रमाणात येतात. संबंधित मार्गावर वन्यप्राण्यांची वर्दळ वाढल्याने वाहनचालकांनी सावधगिरी बाळगावी,**
**- उमेश गोटेफोडे, क्षेत्र सहाय्यक जांभळी(ड व्वा)**

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**सडक अर्जुनी :** गोंदिया–कोहमारा मार्गावरील भूताई नाला शिवारात नीलगायच्या अचानक धडकेत स्विफ्ट कारचा समोरचा भाग मोठ्या प्रमाणात क्षतिग्रस्त झाला.

सविस्तर माहिती अशी की, गोंदिया येथील अर्पित अगरवाल हे स्विफ्ट कार (क्रमांक ए ३५ उ ५४७९) ने कोहमारा कडे जात असताना भूताई नाला परिसरात अचानक रस्त्यावर आलेल्या नीलगायची कारला जोरदार धडक बसली. या अपघातात कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. या घटनेची नोंद डुग्गीपार पोलीस स्टेशन येथे घेण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

# जखमी करिता सचिन डोंगरवार ठरले देवदूत

## सहाय्यक वन संरक्षण विभागाचे अधिकाऱ्यांनी बजावली, मोलाची कामगिरी



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**सालेकसा :** गोंदिया वन विभाग गोंदिया येथील कार्यरत सहाय्यक वन संरक्षण विभागाचे सचिन, डोंगरवार , दिनांक, १९,०१.२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता साखरीटोला ते कारूटोला कडे मोटारसायकल ने दोन बहिन भाऊ जात होते त्यांना अज्ञात वाहनाने धडक देऊन जखमी केले होते व ते तेलीटोला समोर रोड वर जख्मी अवस्थेत पडले होते त्याच वेळेस सचिन डोंगरवार सहाय्यक वनसंरक्षक रो ह यो व वन्यजीव गोंदिया वनविभाग गोंदिया हे साकरीटोला वरून देवरी कडे जात होते त्यांनी आपली गाडी थांबवून दोन्ही जखमी बहिन भावाला शासकिय वाहनाने साखरीटोला सातगाव प्राथमिक आरोग्य केंद्र येथे आणून उपचार केला. त्या बहिन भावासाठी सचिन डोंगरवार हे देवदूत ठरले. सदर जखमीचे नाव अंजली तेजराम नेताम १८, वर्ष जयंत तेजराम नेताम वय, १७ वर्ष राहणार देवरी असे जखमी चे नाव आहे साहेब वन उपसंरक्षण विभागाचे सचिन डोंगरवार यांचे जखमीच्या नातेवाईकाकडून व आई-वडिलाकडून मोलाचे कार्य केले त्याबद्दल त्यांचे सहारणीय कार्य मनावा लागेल.

# बिबट्याने शेळ्या केल्या ठार



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**गोंदिया :** तालुक्यातील गंगाझरी वनपरिक्षेत्रांतर्गत टिकायतपूर येथे बिबट्याने दोन शेळ्या ठार केल्याची घटना २० जानेवारीच्या पहाटे सुमारास उघडकीस आली. या प्रकाराने परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

गंगाझरी लगतच्या टिकयातपूर येथिल आदिवासी आश्रम शाळेला लागून असलेल्या आवार भिंती जवळील परमेश्वर कवरे रा टिकयतपूर गंगाझरी यांच्या राहते घरातील गोट्यात शिरून एका बिबट्याने रात्रीच्या सुमारास दोन शेळ्या ठार केल्या. घरातील कुटुंबीय झोपलेले असताना बिबट्याने दोन शेळ्यांवर हल्ला करून त्यांना ठार मारले. गोठ्यात एकुण तीन शेळ्या असुन शेळ्यांच्या आवाजामुळे घरातील सदस्यांनी आरडाओरड केल्याने बिबट्याने पळ काढला. मात्र, दोन शेळ्या घटनास्थळीच मृतावस्थेत सापडल्या त्यातील एक शेळी गोट्यात तर दुसरी गोठ्यापासून १०० फुट अंतरावर दिसुन आली. या घटनेची माहिती स्थानिकांनी वन विभागाला दिली. वन विभागाच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन तपास केला असून पंचनामा तयार केला. बिबट्याच्या पाऊलखुणा आणि हल्ल्याचे निशाण पाहून हे बिबट्याचेच कृत्य असल्याचे निश्चित झाले आहे.

# खा.डॉ. नामदेव किरसान यांच्या मागणीला यश



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**सालेकसा :** भौगोलिकदृष्ट्या विस्तीर्ण असून शेती हा येथील प्रमुख व्यवसाय आहे. मात्र दरवर्षी खरीप हंगामात शेतकऱ्यांना आवश्यक असणाऱ्या युरिया रासायनिक खताच्या पुरवठ्यात मोठ्या अडचणी निर्माण होत होत्या. अपुरा साठा आणि विलंबित पुरवठ्यामुळे शेतकऱ्यांना युरियासाठी रांगा लावाव्या लागत होत्या व मोठ्या प्रमाणात हेळसांड सहन करावी लागत होती.

ही गंभीर समस्या लक्षात घेऊन गडचिरोली–चिमूर लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ. नामदेव किरसान यांनी पावसाळी अधिवेशनादरम्यान संसदेत गडचिरोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी तेलंगणा राज्यातील रामागुंडम येथून थेट युरिया खताचा पुरवठा करण्यात यावा, अशी मागणी केली होती.

खासदार डॉ. किरसान यांच्या या मागणीला यश आले असून, आता रामागुंडम (तेलंगणा) येथून थेट गडचिरोली जिल्ह्यात युरिया खताचा पुरवठा करण्यात येणार आहे. यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना वेळेत व पुरेशा प्रमाणात युरिया उपलब्ध होणार असून शेती कामांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# पालकमंत्र्यांना नगरसेवकांचे निवेदन



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**गोंदिया :** मागील चार वर्षापासून पालिकेवर प्रशासकीय यंत्रणेचे राज होते. त्यातच आता निवडणुकीनंतर पदाधिकाऱ्यांनी कारभार हाती घेतला आहे. शहरातील स्वच्छता व इतर समस्या आवासून उभ्या आहेत. या समस्यांना घेवून नगराध्यक्ष व नगरसेवकांनी आज स्थानिक विश्राम गृहात जिल्ह्याचे पालकमंत्री इंद्रनील नाईक यांची भेट घेतली. तसेच शिवसेना व काँग्रेसच्या नगरसेवकांनी शहरातील समस्यांचे निवेदन दिले. तसेच समस्या मार्गी लावण्यासाठी आवश्यक तो निधी देण्याची मागणी केली.

नगर परिषदेमार्फत जनतेकडून नियमितपणे कर व विविध शुल्क वसूल केले जात आहेत. मात्र प्रत्यक्षात सर्व प्रभागांमध्ये नियमित साफसफाई होत नसल्याचे विदारक चित्र दिसून येत आहे. सर्व प्रभागांमध्ये स्वच्छता कर्मचारी अनियमित आहेत. कचरा उचलण्याची घंटागाडी उपलब्ध असूनही ती वापरात आणली जात नाही. 'गाडी खराब आहे' असे कारण सातत्याने दिले जाते; परंतु दुरुस्ती करून सेवा सुरू करण्याची कोणतीही ठोस कार्यवाही दिसून येत नाही. परिणामी कचरा साचून परिसरात दुर्गंधी, अस्वच्छता व रोगराई पसरण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. नगर परिषद ही जनतेच्या करावर चालणारी संस्था असून नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित व आरोग्यदायी वातावरण देणे ही आपली प्राथमिक जबाबदारी आहे. मात्र सध्या सर्व प्रभागांतील नागरिकांच्या समस्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचे स्पष्ट दिसत आहे. या समस्यांना घेवून, सर्व प्रभागांमध्ये दररोज नियमित स्वच्छता सुरू करावी, घंटागाडी तातडीने दुरुस्त करून नियमितपणे कार्यरत ठेवावी, स्वच्छता कर्मचाऱ्यांची उपस्थिती व कामकाजावर कठोर नियंत्रण ठेवावे अशा मागण्यांचे निवेदन दिले. दरम्यान यावर उपाययोजना न झाल्यास आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनाच्या माध्यमातून देण्यात आला आहे.

# गुमाधावडा शाळेत तीन दिवसीय वार्षिक क्रीडा महोत्सव



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**तिरोडा :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र शासनाने राबविलेल्या मुख्यमंत्री 'माझी शाळा सुंदर शाळा' या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत गणेश हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, गुमाधावडा येथे १९, २० व २१ जानेवारी रोजी तीन दिवसीय वार्षिक क्रीडा महोत्सवाचे अत्यंत भव्य, शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. या क्रीडा महोत्सवाने शाळा, विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांमध्ये नवा उत्साह निर्माण केला.

क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी महिला जागृती संस्थेचे संस्थापक राधेलाल पटले यांच्या अध्यक्षतेखाली द्वीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची विधिवत सुरुवात करण्यात आली. यावेळी एस.बी.पटले, प्राचार्य डी.आर.पटले, कृउबास संचालक अनिल भगत, ओमभाऊ पटले, रेवाचंद येळे, सरपंच पदमाताई कंगाली, मेश्रामताई, रवीशंकर पटले, सुशीला चौधरी, अंजिरा पंधरे, प्रवीण रहांगडाले, पृथ्वीराज वाहने, राजेंद्र कटरे, सुशील कापसे, नितीन बनसोड सर्व ग्रामपंचायत सदस्य तसेच सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून 'खेळामुळे केवळ शरीरच नव्हे तर मन व विचारही सक्षम होतात', असे सांगत विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत क्रीडेलाही तितकेच महत्त्व देण्याचा संदेश दिला. ग्रामीण भागातील विद्यार्थी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकू शकतात, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. १९ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता उद्घाटनानंतर कबड्डी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विविध संघांमधील सामने अत्यंत चुरशीचे ठरले. विद्यार्थ्यांनी ताकद, डावपेच आणि संघभावनेचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. प्रेक्षकांनी खेळाडूंना उत्स्फूर्त दाद दिली. कार्यक्रमाचे संचालन एस.पी.डोंगरे यांनी प्रभावी व नेटकेपणाने केले, तर आभार प्रदर्शन पी.सी.शरणागत यांनी केले.

## जाहीर सुचना

श्री. भिमेश्वरराव नारायणमुर्ती पान्डुरवाडा इनके नाम से नगर परिषद रिकार्ड में नाम दर्ज है। जिसका वार्ड क्र. ३, वार्ड का नाम बी.एम. पटेल वार्ड, मालमत्ता क्र.३/३६७ है। उक्त मालमत्ता धारक का निधन दि.२९/१०/१९९८ को हो चुका है। इनके निधन उपरांत इनके वारसान १) अम्माजी भिमेश्वरराव पान्डुवाडा, २) नागेश्वरराव भिमेश्वरराव पान्डुवाडा. ३) प्रभावती भिमेश्वरराव पान्डुवाडा, ४) नादुपालीपद्मा नादुपालीकेवंकट सत्यकुमार इन्होने वारसान आधार पर हस्तांतरण हेतु आवेदन सादर किया है। हस्तांतरण पर यदी आक्षेप हो तो वह सुचना प्रकाशीत होने के पश्चात १५ दिन के भितर अपना आक्षेप इस कार्यालय में प्रमाणीत दस्तावेज सहित सादर करेंगे। आक्षेप प्रापप्त न होने पर हस्तांतरण की कारवाई की जायेगी।

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, गोंदिया**

युवाराष्ट्र दर्शन

# भंडारा जिल्हा

बुधवार दि.२१ जानेवारी २०२६

## आंधळगावात सार्वजनिक श्रीमद् भागवत सप्ताहाचे आयोजन

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी




**आंधळगाव :** येथील सार्वजनिक श्रीमद् भागवत सप्ताह मंडळाच्या वतीने मागील २६ वर्षांपासून अखंडपणे श्रीमद् भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात येत आहे. अनंत धर्मांचे व अनंत पंथांचे लोक असले तरी सर्व ग्रामस्थ एकजुटीने, एकभावाने या धार्मिक उपक्रमात सहभागी होत असून दरवर्षी भक्तिभावाने भागवत सप्ताह साजरा केला जातो.

यावर्षी हा श्रीमद् भागवत सप्ताह दि. २१ जानेवारी ते २७ जानेवारी २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहेत. या सप्ताहादरम्यान दि. २१ जाने. २०२६ सकाळी ११ वा. व्यासपीठ पूजन व उद्घाटन समारंभ ,दि. २२ जाने.२०२६ दु. १२ ते २ वा. रांगोळी स्पर्धा व दि. २३ जाने.२०२६ दु. १२ ते ४ वा. भजन स्पर्धा (फक्त स्थानिक मंडळ) इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

युवाराष्ट्र दर्शन
पत्रकार होण्याची सुवर्णसंधी
दैनिक युवाराष्ट्र दर्शन
वृत्तपत्राकरीता भंडारा जिल्ह्यातील लाखनी, लाखांदुर,पवनी येथे तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे आहे. तसेच गाव पातळीवर वार्ताहर नियुक्त करणे आहे.
संपर्क मो.: ९९२३०७०३९२

## लाचखोर सेवाकर अधिकारी जाळ्यात



- ३५ हजारांची लाच स्वीकारतांना रंगेहात अटक
- भंडाऱ्यात एसीबीची यशस्वी सापळा कारवाई

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** बंद असलेला जीएसटी क्रमांक पुन्हा सुरू करून देण्यासाठी ३५ हजार रुपयांची लाच मागणाऱ्या वस्तू व सेवा कर विभागातील राज्य कर निरीक्षकास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग भंडारा यांनी लाचेची रक्कम स्विकारतांना रंगेहात अटक केली. मनीष मुरलीधर सहारे (५०) असे लाचखोर अधिकाऱ्याचे नाव आहे.

तक्रारदार (३६) यांचा जीएसटी क्रमांक ऑक्टोबर २०२५ पासून बंद होता. तो पुन्हा सुरू करण्यासाठी त्यांनी दि. २ नोव्हेंबर २०२५ रोजी gst.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज केला होता. जीएसटी विभाग, नागपूर येथून लेझर शीट तयार करून त्यानुसार चालान भरण्याबाबत कळविण्यात आले. त्यानुसार तक्रारदाराने १० हजार ४२८ रुपये इतकी रक्कम ऑनलाईन भरली.

यानंतर जीएसटी क्रमांक सुरू न झाल्याने तक्रारदाराने जीएसटी विभाग, भंडारा येथील अधिकारी मनीष सहारे यांची भेट घेतली. यावेळी आरोपी अधिकाऱ्याने जीएसटी क्रमांक पुन्हा सुरू करून देण्यासाठी ३५,००० रुपयांची लाच मागितली. लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदाराने दि. १५ जानेवारी २०२६ रोजी एसीबी भंडारा येथे तक्रार दाखल केली.

दि. १६ जानेवारी २०२६ रोजी पंचासमक्ष पडताळणीदरम्यान आरोपीने ३५ हजार रुपये लाच स्वीकारण्याची स्पष्ट मागणी व सहमती दर्शवली. त्यानंतर दि. २० जानेवारी रोजी जीएसटी कार्यालय, भंडारा येथे सापळा रचण्यात आला. सापळा कारवाईदरम्यान आरोपी मनीष सहारे यांनी तक्रारदाराकडून ३५,००० रुपये लाचेची रक्कम स्वतः स्वीकारली, त्याचवेळी एसीबी पथकाने त्यांना रंगेहात पकडले.

आरोपीची घरझडतीची प्रक्रिया सुरू असून, भंडारा पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. गुन्हा नोंद झाल्यानंतर आरोपीस अटक करण्यात येणार आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक दिगंबर प्रधान, अपर पोलीस अधीक्षक माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक विजय माहुलकर, पोलीस उपधीक्षक डॉ. अरुणकुमार लोहार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. पथकात पोलीस निरीक्षक उज्वला मडावी, नितेश देशमुख यांच्यासह एसीबी भंडारा येथील अधिकारी व कर्मचारी सहभागी होते.

## भरतीचे आदेश मात्र; अंमलबजावणीचा पत्ता नाही

### साकोली बाल प्रकल्पाला शंकरपुर ग्रामवासीयांचे पुन: निवेदन



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**साकोली :** साकोली तालुक्यातील शंकरपुर/वडे. येथील अंगणवाडी केंद्रात, अंगणवाडी मदतनीस पदभरती प्रकरणी आयुक्त व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशाला दिर्घ काळ लोटला असला तरीही अंगणवाडी मदतनीस पदभरतीची, साकोली बालविकास प्रकल्प अंतर्गत अजूनही अंमलबजावणी न झाल्याने, संतप्त शंकरपुर ग्रामस्थांच्या वतीने १३ जाने. मंगळवार रोजी स्वाक्षरानीशी त्वरित पदभरती राबवून अंमलबजावणी करण्यात यावी असे निवेदन देण्यात आले.

गेल्या वर्षी, स्थानिक उमेदवाराच्या मुद्द्यावरून, वडेगांव येथील उमेदवार वर्षा लांजेवार यांच्या विरोधात चांगलेच आंदोलन चिघळले होते. परिणामी सदर उमेदवार अपात्र ठरून गावकऱ्यांच्या लढ्याला यश मिळाले होते व स्थानिक उमेदवाराच्या अटीचा मुद्दा मार्गी लागला होता.

पश्चात नागपुर विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी व भंडारा जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंदकुमार साळवे यांनी नव्याने भरती प्रक्रिया राबविण्याचे आदेश देखील साकोली बालविकास प्रकल्पाला दिले होते. मात्र; आयुक्तांच्या आदेशाला थेट तीन तर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशाला तब्बल पाच महिने लोटली तरी देखील अजूनही साकोली बालविकास प्रकल्प अंतर्गत अद्याप भरती प्रक्रियेची कुठलीही कार्यवाही न झाल्याने पुन: एकदा गावकरी तापले असून विविध चर्चांना उधाण फुटले आहे. तर याच पार्श्वभूमीवर शंकरपुर ग्रामस्थांच्या प्रमुख उपस्थितीत साकोली बालविकास प्रकल्प येथील अधिकाऱ्यांना निवेदन सोपवून भोगवटा प्रमाणपत्र घेण्यात आले आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांनी, कनिष्ठ अधिकाऱ्यांना अंमलबजावणीची तारीख दिली नसली तरीही नियमाने आदेशाची पूर्तता तीन ते सहा महिन्यांच्या कालावधीत करणे बंधनकारक असते.

श्री. सुरेशकुमार पंधरे
(माजी सरपंच : ग्रा.पं. शंकरपुर/वडे.)

आयुक्तांच्या आदेशानंतर दिवाळी व दिवाळीनंतर साकोली नगरपरिषद निवडणूक दरम्यान आचारसंहिता असल्याने कदाचित भरती प्रक्रिया झाली नसावी. मात्र; आता कसलाही विलंब न करता भरती प्रक्रिया राबवावी.

सौ. रामेश्वरी वाढवे
(माजी अध्यक्षा : शा.व्य.स. शंकरपुर/वडे.)

## तीन स्थानिक सुट्ट्या जाहीर

**भंडारा :** जिल्हाधिकारी सावन कुमार यांनी शासकीय आदेशाद्वारे भंडारा जिल्ह्यासाठी तीन स्थानिक सुट्ट्या जाहीर केल्या आहेत.

या आदेशानुसार सोमवार, २ मार्च २०२६ रोजी होळी, शुक्रवार,११ सप्टेंबर २०२६ रोजी पोळा (दुसरा पोळा) आणि सोमवार ९ नोव्हेंबर २०२६ (दिवाळी अतिरिक्त) दिनाची सुट्टी भंडारा जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयांना जाहीर करण्यात आली आहे. हा आदेश भंडारा जिल्ह्यातील दिवाणी व फौजदारी न्यायालय आणि अधिकोष (बँक) यांना लागू राहणार नाही, असे आदेशात म्हटले आहे.

## तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत सालई खुर्द शाळा प्रथम

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**मोहाडी :** मोहाडी पंचायत समिती अंतर्गत जिल्हा परिषद पालोरा येथे घेण्यात आलेला तीन दिवसीय तालुकास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात सालई खुर्द येथील जिल्हा परिषद शाळेची माध्यमिक मुलींची खो-खो स्पर्धेत २५ वर्षानंतर तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावून जिल्हात स्थान मिळवून गावाचे नाव मोठे केले आहे. तसेच प्राथमिक मुलांनी खो-खो स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकाविला आहे. पहिल्यांदाच दमदार कामगिरी करीत विद्यार्थ्यांनी सुयश मिळविले आहे.

शिक्षकांनी मेहनत घेऊन विद्यार्थ्यांना घडविले आहे, शिक्षकांनी व गावकऱ्यांनी जिद्द निर्माण करून जिल्हात क्रीडा स्पर्धेत गावाचे नाव मोठे केले आहे. सालई खुर्द शाळेची २५ वर्षानंतर जिल्ह्यात विद्यार्थी क्रीडा स्पर्धेत खेळायला जाणार असल्याने कौतुक होत आहे. गावात मिळवणूक काढून मुलांचा उत्साह वाढविण्याच्या हेतूने सालई खुर्द येथे रॅली काढून त्यांचा सन्मान करण्यात आला.या यशाबद्दल मुख्याध्यापक वाय.जी.भुरे, शिक्षक व्ही.बी. ठवकर, शिक्षक डी.एस.हाके, शिक्षक युनुस कुरेशी, शाळेचे अध्यक्ष लालचंद ठाकरे, सरपंच अनिता पटले,उपसरपंच बबलू सव्वालाखे, शाळा समितीचे सदस्य एमरीत ठाकरे, श्रीकांत बन्सोड, सुनील ठाकरे, गोपाल लिल्हारे, सामाजिक कार्यकर्ता भारत पटले, नितीन लिल्हारे, हरीश मांढरे, तुषार दमाहे, आशिष दमाहे, राकेश मेश्राम, संदीप पटले, राजेश दमाहे, छोटू ठाकरे, नंदलाल अटराहे, राजकुमार लिल्हारे, विनोद राणे, विवेक पटले, राजू अटराहे, महेश गराडे, शंकर गराडे, मोनू रहांगडाले, विशाल दडमल, मंनसाराम लिल्हारे, रणबीर लिल्हारे, राजेश कोहरे, महादेव लिल्हारे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## रुग्णालयाला १० ऑक्सिजन सिलेंडर दान

**तुमसर :** अबाधा फाउंडेशन तुमसर ही एक सामाजिक संस्था असून गेली १० वर्षापासून समाजसेवेचे कार्य करीत आहे, गावागावामध्ये आरोग्य शिबीर घेणे, महिलांना सक्षमीकरण करणे, शिवणकाम प्रशिक्षण, ब्युटी पार्लर प्रशिक्षण तसेच विविध सामाजिक कार्यक्रम घेत आहेत. त्याच अनुषंगाने शुक्रवार दिनांक १६ जानेवारी २०२६ ला शासकीय रुग्णालय तुमसर येथे गोर गरीब रुग्णाच्या सेवे करीता १० ऑक्सिजन सिलेंडर भेट स्वरुपात देण्यात आले. संस्थेचे संस्थापक माधुरीताई पटले यांच्या मार्गदर्शनाखाली देवकाताई पटले, इंजि. जय मोरे, नीलकंठ सिंगाडे व रुग्णालयाचे अधिकारी शैलेश मानमोडे, वरिष्ठ औषध निर्माण, अभिषेक आडे औषध निर्माण अधिकारी, अविलास फुले वाहन चालक, ललित पांडे कक्ष सेवक, चंद्रकिशोर नेरकर कक्ष सेवक उपस्थित होते.

## अस्वलाच्या हल्ल्यात गुराख्याचा मृत्यू

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी



**साकोली :** साकोली वनपरीक्षेत्रातील सानगडी (पूर्व) उपवन क्षेत्रातील पापडा-१ बिट, कक्ष क्रमांक २०५ (राखीव वन) येथे गुरे चराईसाठी गेलेल्या इसमावर अस्वलाने हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना घडली. उपचारासाठी नागपूर मेडिकलमध्ये दाखल असलेले सोनका (पळसगाव) येथील रहिवासी दौलत मणिराम राऊत (वय ५५) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

दि. १९ जानेवारी रोजी दौलत राऊत हे दोन साथीदारांसह जंगलात गेले होते. दुपारी १.३० ते २ वाजताच्या सुमारास जवळच लपून बसलेल्या अस्वलाने अचानक हल्ला चढविला. हल्ल्यापूर्वी अस्वलाने आपली उपस्थिती दर्शविणारे संकेत दिले होते; मात्र सतर्कता न घेतल्याने प्रसंग ओढवला. काही अंतरावर उभ्या असलेल्या साथीदारांनी धाव घेऊन हस्तक्षेप केल्यावर अस्वल जंगलात निघून गेले.

हल्ल्यानंतर जखमी दौलत राऊत यांना तत्काळ उपजिल्हा रुग्णालय साकोली येथे नेण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर त्यांना जिल्हा रुग्णालय भंडारा येथे हलविण्यात आले. तेथे सहाय्यक वनसंरक्षक संजय मेंढे यांनी भेट देऊन उपचारासाठी वनविभागाकडून ३० हजार रुपयांचे अर्थसहाय्य दिले. प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी नागपूर मेडिकलमध्ये हलविण्यात आले; मात्र मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने रात्री सुमारे ९.३० वाजता त्यांचे निधन झाले.

घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे क्षेत्र सहाय्यक गुरबेले, खंडागळे, वनरक्षक आशिष तूरकर, एस. एन. मेश्राम घटनास्थळी दाखल झाले. वनक्षेत्राधिकारी सचिन कटरे यांच्या मार्गदर्शनाखाली रेस्क्यू पथकासह पंचनामा करून परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. पुढील धोके टाळण्यासाठी तातडीच्या उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत. दरम्यान, साकोली वनपरिक्षेत्र कार्यालयाकडून गावोगावी जनजागृती करण्यात येत असतानाही अनेक नागरिक सूचनांकडे दुर्लक्ष करून जंगलात प्रवेश करीत असल्याचे चित्र आहे. वन्यजीवांच्या हालचालींबाबत सतर्क राहणे व दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे अत्यावश्यक असल्याचे वनविभागाने पुन्हा अधोरेखित केले आहे.

## अखेर 'त्या' अपघातातील जखमी महिलेची मृत्यूशी झुंज संपली



### चारचाकीच्या धडकेत गंभीर जखमी झाली होती सविता

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**साकोली :** बहिणाला गावी जाण्यासाठी बसस्थानकावर सोडून देण्यासाठी जात असलेल्या महिलेच्या स्कुटीला अज्ञात चारचाकी वाहनाने धडक दिली होती. यात तिघे जखमी झाल्याची घटना सेंदूरवाफा येथे दि.१५ जानेवारी २०२६ रोजी घडली होती. या घटनेतील गंभीर जखमी महिलेचे पाच दिवसांच्या मृत्यूशी झुंजीनंतर अखेर दि.१९ जानेवारी रोजी रात्री १० वाजता नागपूर येथील खाजगी दवाखाण्यात उपचारादरम्यान निधन झाले. सविता शरद समरीत वय ३५ असे या दुदैवी मृतक महिलेचे नाव आहे.

सविस्तर वृत्तानुसार रुपाली विकेश गोबाडे (वय ३१) ही तिची बहिण सविता शरद समरीत (वय ३५) व सविताचा मुलगा शौर्य (वय १०) रा. पिंडकेपार, ह. मु. वाटोळा नागपूर यांना नागपूरला जायचे असल्याने त्यांना साकोली येथे सोडण्यासाठी स्कुटीने जात होते. दरम्यान सेंदूरवाफा हावये लॉजचे अगोदर सेंदूरवाफा ते साकोली जाणाऱ्या सर्विस रोडवर अज्ञात चारचाकी वाहनाने त्यांच्या स्कुटीला धडक मारली. यात ते खाली पडून तिघेही जखमी झाले होते. यानंतर चारचाही वाहन चालक वाहनासह पळून गेला. सदर घटनेची पोलीस स्टेशन साकोली येथे नोंद करण्यात आली होती. अपघातानंतर तिघाही जखमींना उपचारासाठी नागपूर येथे खाजगी दवाखाण्यात दाखल करण्यात आले होते. सवितावर गंभीर अवस्थेत चार पाच दिवस उपचार सुरू असतांना दि.१९ जानेवारीच्या रात्री त्यांचे दुर्दैवी निधन झाले. दि.२० जानेवारी रोजी अत्यंत शोकाकूल वातावरणात त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी ५ वाजता पिंडकेपार येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मृत्यूपश्चात पती व चिमुकला शौर्य असा परिवार आहे.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत तरूणी जखमी

**भंडारा :** तालुक्यातील खुर्शिपार येथील मयूरी संजय जमजार (२५) ही दि. १७ जानेवारी रोजी मैत्रीन प्राची आठवले हिचेसोबत सायकलने मैदानावरून सराव करून घरी जाण्यास निघाले.शितलामाता मंदिराजवळ मागेहून जाणाऱ्या चारचाकी वाहन चालकाने वाहन निष्काळजीपणे चालवून सायकलला धडक दिली. यात सायकलस्वार तरूणी रस्त्यावर पडून जखमी झाल्या. धडकेनंतर वाहनचालक घटनास्थळावरून पसार झाला. जखमींना उपचाराकरीता रुग्णालयात पाठविण्यात आले. जखमीच्या तक्रारीवरून भंडारा पोलिसात वाहनचालक विरूद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## मोटारसायकलवरून पडून महिला जखमी

**भंडारा :** भंडारा जवळील कारधा चौकाजवळ पवनी मार्गावर मोटारसायकल अनियंत्रित होवून मागे बसलेली महिला रस्त्यावर पडून जखमी झाली. सदर घटना दि. १८ जानेवारी रोजी सकाळी ७.४० वा. दरम्यान घडली. सुशिला तुकाराम बावनकुळे (६५) रा. सिल्ली जखमीचे नाव आहे.

भंडारा तालुक्यातील सिल्ली येथील जखमी सुशिला बावनकुळे ही आपल्या मुलासोबत मोटारसायकल क्र. एमएच ३६ क्यू ५४५२ या गाडीने स्व गावावरून भंडाराकडे येत असताना कारधा चौकाजवळ गिरोला जुना नाका, पवनी रस्त्यावर मोटारसायकल अनियंत्रित होवून मागे बसलेली सुशिला ही महिला रस्त्यावर पडली. त्यात तिच्या डोक्याला व पायाला गंभिर दुखापत झाली. अपघाताची माहिती जगतगुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य रूग्णवाहिका चालक यांना मिळताच त्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत जखमीला उपचाराकरीता जिल्हा रुग्णालयात दाखल केले.

## बोलेरो वाहनाची एसटी बसला धडक

**भंडारा :** कारधा-पवनी मार्गावर सिंधपूरी टि-पाईंट जवळ दि. १६ जानेवारी रोजी सकाळी ७ वाजता दरम्यान निलजकडे जाणारी भरधाव बोलेरो पिकअप वाहन प्रवासी घेऊन जाणाऱ्या एसटी बसला धडक दिली. यात सुदैवाने जीवित हानी टळली. घटनेच्यावेळी एसटी बस क्र. एम एच ४० एक्यू ६३१९ ही पवनी येथून प्रवासी घेऊन आसगाव मार्गे मोरगाव / अर्जुनी येथे जाण्यास निघाली. सिंधपूरी टि-पाईंट जवळ भंडाराकडून निलजकडे जाणारी बोलेरो पिकअप वाहन क्र. एम एच ३४ बीझेड ७०१३ च्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन निस्काळजीपणे चालवून एसटी बसला धडक दिली.

## महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेच्या अंतरिम निकालाच्या अनुषंगाने आक्षेप असल्यास नोंदवावे

**भंडारा :** शासनाच्या वतीने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे या कार्यालयामार्फत महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेचे आयोजन २३ नोव्हेंबर २०२५ रोजी करण्यात आले होते. महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०२५ पेपर क्र. १ व पेपर क्र. २ ची अंतिम उत्तरसूची महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या http:// mahatet.in या अधिकृत संकेतस्थळावर १२ जानेवारी २०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. तरी पेपर क्र. १ व पेपर क्र. २ साठी प्रविष्ठ झालेल्या उमेदवार/परीक्षार्थ्यांचा अंतरिम निकाल १६ जानेवारी २०२६ रोजी http://mahatet.in या संकेतस्थळावर उमेदवार/परीक्षार्थ्यांच्या लॉगिनमध्ये ऑनलाईन पद्धतीने सायंकाळी ६ वाजल्यापासून पाहता येत आहे.

अंतरिम निकालाच्या अनुषंगाने गुण पडताळणी करावयाची असल्यास अथवा त्रुटी अथवा आक्षेप असल्यास http://mahatet.in या संकेतस्थळावर २१ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत उमेदवार/परीक्षार्थीना लॉगीन मधून ऑनलाईन पद्धतीने आक्षेप नोंदविता येईल. अन्य मार्गाने आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची संबंधित सर्व उमेदवार/परीक्षार्थीनी नोंद घ्यावी,असे आवाहन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

## लाखांदूर तालुक्यात विशेष घटक योजनेत मोठा भ्रष्टाचार

### माजी समाजकल्याण सभापती चंद्रशेखर टेंभूर्णे यांची कार्यवाहीची मागणी



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**बारव्हा :** शासनाच्या पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या दुधाळ जनावरे वाटप योजनेत लाखांदूर तालुक्यात मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. पशु वैधकीय अधिकारी आणि पुरवठादारानी संगणमत करून शासनाच्या निधीचा अपहार केल्याचा आरोप माजी समाजकल्याण सभापती चंद्रशेखर टेंभूर्णे यांनी केला असून याप्रकरणी महाराष्ट्र राज्याचे सचिव, व आयुक्त यांच्या कडे तक्रार दाखल केली आहे.

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात विशेष घटक योजने अंतर्गत अनुसूचित जाती व जमातीच्या लाभार्थ्यांना ७०% अनुदान व इतर प्रवगार्तील लाभार्थ्यांना ५०% अनुदानवर दुधाळ गाई व म्हशीचे वाटप करण्यात आले. या योजनेचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील पशुपालकांना आर्थिकदुष्टया सक्षम करणे हा होता. मात्र प्रत्यक्षात ही योजना अधिकारी आणि पुरवठादारांच्या फायद्याची ठरल्याचे दिसत आहे.

निवेदनातील आरोपनुसार बाजारात ज्या म्हशीची किंमत साधारणता १ लाख ६० हजार रुपये आहे. त्या म्हशी केवळ ७० ते ७५ हजारात खरेदी करून लाभार्थ्यांना देण्यात आल्या. गाईच्या खरेदीत असाच प्रकार घडला असून त्याची खरेदी अर्धा किमतीत करण्यात आली. कमी किमतीत जनावरे खरेदी करून पुरवठादाराच्या नावाने मात्र पूर्ण किंमतीचे (शासकीय दराप्रमाणे) देयके काढून शासनाची दिशाभूल करण्यात आली. कमी किंमतीत खरेदी केल्यामुळे जनावराचा दर्जा निकृष्ट असून लाभार्थ्यांना अपेक्षित दूध उत्पादन मिळत नसल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. हा सर्व व्यवहार पशुवैधकीय अधिकारी आणि पुरवठादारानी स्वमर्जीने आणि सगणमताने केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या गंभीर प्रकरणाची दखल घेत चंद्रशेखर टेम्भूरणे यांनी महाराष्ट्र राज्याचे सचिव, पशुसंवर्धन आयुक्त पुणे, आणि जिल्हाधिकारी भंडारा यांना यांना निवेदन पाठविले असून या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करून दोषी अधिकारी व पुरवठादारावर कडक कायदेशीर कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. या तक्रारीमुळे पशुसंवर्धन विभागात खळबळ उडाली असून जिल्हा प्रशासन यावर काय पाऊले उचलते याकडे सर्व तालुकावाशियांचे लक्ष लागले आहे.

# आर्वी नगर परिषदेच्या विषय समितीचे झाले गठण

**उपाध्यक्ष गौरव जाजु यांना शिक्षण समिती तर, जगण गाठे, संजय राऊत, संजय थोरात, अजय कटकमवार, सौ. भारती पोटफोड यांची सभापती पदी झाली निवड**

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**आर्वी, दि. २०**

जिल्हाधिकारी वर्धा यांच्या निर्देशानुसार मंगळवारी (ता.२०) घेण्यात आलेल्या विशेष साधारण सभेमध्ये विषय समित्यांचे गठण करण्यात आले आहे.

नगर परिषदेच्या सभागृहात झालेल्या या विशेष विशेष सभेत उपाध्यक्षाकरीता शिक्षण समिती राखीव ठेवण्यात आली असुन या समितीचे अध्यक्ष गौरव जाजु हे राहणार आहेत. तर, नगर विकास व नियोजन समितीच्या सभापती पदावर जगन गाठे, बांधकाम समितीच्या सभापती पदावर संजय राऊत, आरोग्य समितीच्या सभापती पदी संजय थोरात, पाणी पुरवठा समितीच्या सभापती पदावर अजय कटकमवर, तर, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती पदावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या सौ. भारती पोटफोडे यांची निवड करण्यात आली आहे.


गौरव जाजू न प आर्वी उपाध्यक्ष


जगन गाठे नगर विकास व नियोजन समिती सभापती


भारती पोटफोडे महिला व बालकल्याण समिती सभापती


संजय राऊत बांधकाम समिती सभापती

प्रत्येक समीती ही सहा सदस्यांची असुन प्रत्येक समिती मध्ये भाजप व राष्ट्रवादी काँग्रेसचे चार सदस्य तर राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.), काँग्रेस व शिवसेनाउबाठा) च्या दोन दोन सदस्यांची निवड करण्यात आली आहे.

आमदार सुमीत वानखेडे, नगराध्यक्षा सौ. स्वाती गुल्हाणे, राष्ट्रवादी काँग्रेसचे दिलीप पोटफोडे, शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख दशरथ जाधव आदिंनी समीती सभापती व सदस्यांचे अभिनंदन करुन पुढील वाटचाली करीता शुभेच्छा दिल्या आहेत.

या विशेष सभेचे पिठासीण अधीकारी उपविभागीय अधिकारी विर्श्वास शिरसाठ हे होते. तर, मुख्याधिकारी डॉ. किरण सुकलवाडकर, उपमुख्याधिकारी मदन लाडेकर तथा नगर परिषदेच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा पाचही समित्यांवर कब्जा

**नगरपालिकेत समित्यांची बिनविरोध निवड**



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**पुलगाव, दि. २०**

नगरपालिकेत आज दुपारी नगरपालिकेच्या सभागृहात स्थायी समिती व विविध विषय समित्यांच्या निवडणुका पार पडल्या. या निवडणुकांमध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने वर्चस्व सिद्ध करत पाचही समित्यांवर बिनविरोध कब्जा मिळवला.

या निवडणुका पिठासीन अधिकारी प्रतापवाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडल्या. यावेळी नगरपालिकेचे मुख्याधिकारी विजय आश्रमा तसेच सभागृहात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक उपस्थित होते. सर्व समित्यांची निवड प्रक्रिया शांततेत व बिनविरोध पार पडली.

निवडीनुसार बांधकाम समिती सभापती म्हणून शांतीदेव खैरकार यांची निवड करण्यात आली. स्वच्छता व सार्वजनिक आरोग्य समिती सभापती आफरीन अंजुम अब्दुल नजीम ,पाणीपुरवठा समिती सभापती विद्या वलीवकर, शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक कार्य समिती उपसभापती (सभापती दर्जा) म्हणून दीपक जिवतराम आहुजा, महिला व बालकल्याण समिती सभापती करुणा राऊत तर उपसभापती म्हणून शैला रामदास राऊत यांची निवड करण्यात आली. या निवडीनंतर काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त करत शहराच्या सर्वांगीण विकासासाठी समन्वयाने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. नागरिकांच्या मूलभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा, महिला व बालकल्याण तसेच शिक्षण व आरोग्य क्षेत्रात ठोस निर्णय घेण्यात येतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# अट्टल दुचाकी चोरास ठोकल्या बेडया

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. २०**

घरासमोर लॉक करुन ठेवलेली दुचाकी चोरणाऱ्या अट्टल चोरटयास शहर ठाण्यातील गुन्हे शोध पथकाने अटक केली, त्याच्याकडून चोरीतील दुचाकी हस्तगत करत गुन्हा उजेडात आणला.

युगंधर मनोज कार्लेकर (३० रा. महादेवपुरा) यांची एम. एच. २७ सीपी ३१४० क्रमांकाची दुचाकी चोरी गेली होती, याप्रकरणी शहर पोलिसात गुन्हा दाखल होता, तपास सुरू असतानाच दुचाकी आदित्य अनिल ठाकरे (२० रा. केजाजी चौक) याने चोरल्याची माहिती मिळाली, त्याला ताब्यात घेत हिसका दाखवताच त्याने चोरीची कबुली दिली, पोलिसांनी दुचाकी हस्तगत केली,

ही कारवाई पोलिस निरीक्षक संतोष ताले यांच्या मार्गदर्शनात पोलिस उपनिरीक्षक शरद गायकवाड, महेंद्र पाटील, अभिजीत वाघमारे, रंजित भुरसे, अमोल साळवनण, अमोल ढोभळे यांनी केली.

## निधन वार्ता

**कलिंदनी पोटदुखे**



**पुलगाव, :** येथील कलिंदनी श्रीधर पोटदुखे (वय ८४)यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर २१ रोजी अंत्यसंस्कार करण्यात येईल.

### हद्दपारीच्या आदेशाचे उल्लंघन, आरोपी ताब्यात

**वर्धा, :** हद्दपारच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या आरोपीवर गुन्हा दाखल करत ताब्यात घेण्यात आले, ही कारवाई रामनगर पोलिसांनी केली, गोरक्षण वॉर्ड येथील संदेश उर्फ बादल महेंद्र शेंडे यास दोन वर्षाकरिता हद्दपार करण्यात आले, पण, हद्दपारच्या आदेशाचे उल्लंघन करत परवानगी न घेता तो घरी मिळून आला, पोलिसांनी संदेश उर्फ बादल शेंडे यास ताब्यात घेत गुन्हा दाखल केला, अधिक तपास रामनगर पोलिस करीत आहे.

# उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून रॅलीतून जनजागृती

**हेल्मेटचे प्रदर्शन करणारी मोहीम**



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**पुलगाव, दि. २०**

उपप्रादेशिक विभागातर्फे रस्ता सुरक्षा मोहिमेतंर्गत बाइक रॅलीद्वारे पुलगाव येथे जनजागृती करण्यात आली. शहरातील मुख्य रस्त्यावरील स्टेशन चौकापासून आर. के. शाळेपर्यंत आणि स्टेशन चौकापासून कॅम्प रोडवर हायवेपर्यंत रॅली काढण्यात आली. या रॅलीत सहभागी सर्व दुचाकी वाहनधारकांनी सुरक्षित अंतर ठेवून कसे ड्रायव्हिंग करावी, हे दाखवले. तसेच, मोटारसायकल चालकाच्या जीवनरक्षेसाठी 'सर सलामत तर सर्व कुछ सलामत' ही संकल्पना समजावून सांगताना, सुरक्षा दृष्टिकोनातून घालणे किती अनिवार्य आहे, हे प्रदर्शित केले. या रॅलीत सर्व ड्रायव्हिंग शाळांच्या संचालकांनी आणि पुलगाव पोलिस प्रशासनाने सहकार्य देत रस्ता सुरक्षा मोहिम यशस्विपणे राबविली.

### मातीच्या ढिगाऱ्याला दुचाकी धडकल्याने युवक झाला ठार

**वर्धा, :** वळण रस्त्यावर अचानक दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने दुचाकी थेट मातीच्या ढिगाऱ्यावर जाऊन धडकल्याने चालक युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, हा अपघात आष्टी टी पॉईंट तळेगाव श्या. पंत परिसरात झाला.

आयुष उमेश ठवकर (२२ रा. झिंगाबाई टाकळी नागपूर) असे मृतकाचे नाव आहे, आयुष हा सोलार कंपनीच्या कामाने एमएच. ४० डी. जी. २९९४ क्रमांकाच्या दुचाकीने तळेगाव येथे गेला होता, दुचाकीने नागपूरला परत जात असताना, रस्ता कामामुळे वळण रस्त्यावर दुचाकी अनियंत्रित होत थेट मातीच्या ढिगाऱ्यावर जाऊन धडकली, यात तो गंभीर जखमी झाल्याने मृत पावला.

### अपघातात जखमी इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू

**वर्धा :** नंबरप्लेट नसलेल्या दुचाकीने दिलेल्या धडकेत जखमी इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, ही घटना धाडी शिवारात घडली, गोपाल प्रभाकर चचाणे (वय ४५) रा. जामगाव, ता. आष्टी असे मृतकाचे नाव आहे, गोपाल चचाणे यांना धाडी शिवारात नंबरप्लेट नसलेल्या दुचाकीने धडक दिली, त्यात गोपाल चचाणे गंभीररित्या जखमी झाले, त्यांना अमरावती येथील रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला, याप्रकरणी तक्रारीवरुन आष्टी पोलिसांनी गुन्हा दाखल केला, पोलिसांचा पुढील तपास सुरू आहे.

# चोरटयांनी एकाच रात्रीतून दोन जिनिंग फॅक्टरीमधून १६ लाखांची रोकड पळविली

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**तळेगाव (श्या. पं), दि. २०**

तळेगाव-आर्वी मार्गावरील वर्धमनेरीपरिसरात असलेल्या दोन जिनिंग फॅक्टरीमध्ये चोरटयांनी एकाच रात्री डाव साधला, या दोन्ही फॅक्टरीमधून १६ लाख रुपयांची रोकड लंपास केल्याचे सोमवारी सकाळी उघडकीस आले आहे, याप्रकरणी तळेगाव (श्याम. पंत) पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

तळेगाव-आर्वी मार्गावर तळेगावपासून वर्धमनेरीपुर्वी निरंकार कॉटेक्स जिनिंग, तर वर्धमनेरीनंतर जगदंबा जिनिंग फॅक्टरी आहे, या दोन्ही ठिकाणी कापसाची खरेदी सुरू आहे, रविवार दिवसभर कापसाची खरेदी केल्यानंतर कापसाचे चुकारे शेतकऱ्यांना देण्यात आले, त्यानंतर उर्वरित रक्कम कार्यालयातील ड्रॉवरमध्ये ठेवली होती, सोमवारी सकाळी सफाई कर्मचारी जिनिंगमध्ये आले असता कार्यालयातील ड्रॉवर उघडे असून साहित्य अस्ताव्यस्त पडल्याचे निदर्शनात आले, लागलीच त्यांनी व्यवस्थापकाला माहिती दिली, त्यामुळे व्यवस्थापकाने कार्यालयाकडे धाव घेत पाहणी केली असता ड्रॉवरमधील रक्कम गायब झाल्याचे दिसले, यात निरंकार कॉटेक्समधून ७ लाख आणि जगदंबा जिनिंगमधून ९ लाख असे एकुण १६ लाख चोरटयांनी लंपास केले, याप्रकरणी तळेगाव पोलिसांना माहिती देण्यात आली,

घटनेची माहिती मिळताच श्वान पथक, ठसे तज्ज्ञासह पोलिसांना ताफा जिनिंग परिसरात दाखल झाला, उपविभागीय पोलिस अधिकारी चंद्रशेखर ढोले, सहाय्यक पोलिस निरीक्षक मंगेश भोयर, पोलिस उपनिरीक्षक श्याम सोनपराते, राजेश जयसिंगपुरे, अतुल अडसड यांची उपस्थिती होती. त्यांनी दोन्ही फॅक्टरीतील सी. सी. टी. व्ही. फुटेज तपासले असता तीन चोरटे निदर्शनात आले, पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी चंद्रशेखर ढोले यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलिस निरीक्षक मंगेश भोयर, पोलिस उपनिरीक्षक श्याम सोनपराते, जमादार राजेश जयशिंगपुरे, अतुल अडसड यांच्यासह पोलिस कर्मचारी उपस्थित होते.

# प्रजासत्ताक दिनी परेडसाठी सरपंच सोनटक्के यांना निमंत्रण

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**आर्वी, दि. २०**

तालुक्यातील आदर्श ग्राम संसद मिर्झापूर नेरी येथील सरपंच व कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक बाळा सोनटक्के यांना केंद्र सरकारने दिल्ली येथे आयोजित प्रजासत्ताक गणतंत्र दिन सोहळ्याकरता दिनांक २६ जानेवारीला विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहण्याबाबतचे निमंत्रण दिले असून याबाबतचे अधिकृत पत्र ग्रामपंचायतला प्राप्त झाल्याची माहिती ग्रामपंचायत अधिकारी संजय यावले यांनी दिली आहे.



दिल्ली येथे आयोजित ७७ व्या प्रजासत्ताक दिन सोहळ्याकरता संपूर्ण भारतातून ग्राम स्तरावर विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सरपंचांना विशेष अतिथी म्हणून बोलावण्यात आले असून महाराष्ट्र राज्यातून निवड झालेल्या १६ सरपंच महोदयामध्ये वर्धा जिल्ह्यातील आर्वी तालुक्यातील ग्रामपंचायत मिर्जापुर नेरीचे सरपंच बाळा सोनटक्के यांचा समावेश आहे.ते सहपरिवारासह दिल्ली येथील प्रजासत्ताक दिन सोहळ्यात सहभागी होणार आहे. काही दिवसापूर्वी भारतीय गुणवत्ता परिषद यांचे माध्यमातुन बाळा सोनटक्के यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संवाद साधून गावाची यशोगाथा कथन केली होती, हे विशेष.

# प्रजासत्ताक दिनी लाठी नाट्यप्रयोग व सत्कार समारोह

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. २०**

भीमज्योती महिला बहुदेशीय मंडळ व मित्र परिवाराच्या वतीने गुंजखेडा येथे सोमवार, दि. २६ रोजी बहुजन रंगभूमी नागपूर प्रस्तुत 'लाठी' हा नाट्यप्रयोग तसेच सत्कार समारोह आयोजित करण्यात आला आहे.

रमाईनगर येथील बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर पब्लिक स्कूल येथे सायंकाळी ६ वाजता वीरेंद्र गणवीर लिखित व दिग्दर्शित लाठी हे दोन अंकी नाटक सादर होणार आहे. प्रजासत्ताक दिन व क्रांतिज्योती सावित्रीआई फुले जयंतीनिमित्त आयोजित या समारोहाचे उद्घाटन साहित्यिक संजय इंगळे तिगावकर यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्ष हेमलता शंभरकर राहतील. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी संजय थूल, स्वागताध्यक्ष अभिलाष दरवाडे, चंद्रसेन डोंगरे, विठ्ठल वानखेडे, दिलीप टेंभुर्णे, डॉ. जी.डी. अलोने, संदीप कलोडे, सलीमभाई, ॲड. दीपक वाघमारे, स्वप्निल रामटेके यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. समारोहात नाट्यदिग्दर्शक डॉ. विजयकुमार माहुरे , वीरेंद्र गणवीर, प्रभाकर घोडेस्वार, संदीप ढोमणे, संजय विश्वकर्मा, चंद्रकांत वाघमारे यांचा नागरी सत्कार करण्यात येईल.या कार्यक्रमाला परिसरातील नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन सदानंद टेंभुरकर, साहिल सहारे, अशोक चौधरी, देवानंद येसनकर, बाबा घोडेस्वार व आयोजन समिती सदस्यांनी केले आहे.

# प्रतीपंढरीत वैष्णवांची मांदियाळी ; डोळ्यांचे पारणे फेडणारा रिंगण सोहळा.!

**संत केजाजी महाराज पुण्यतिथी महोत्सव; महाराजांच्या जयघोषाने दुमदुमली घोराड नगरी**



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**सेलू, दि. २०**

विदर्भाची प्रतीपंढरी श्रीक्षेत्र घोराड येथे श्री संत केजाजी महाराजांच्या ११९ व्या पुण्यतिथी उत्सवानिमित्त आज सोमवारी भव्यदिव्य असा पालखी व दिंडी सोहळा पार पडला. याप्रसंगी विविध गावांतील ३२० च्यावर भजनी मंडळीसह भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाल्याने घोराड नगरीत भक्तांचा जनसागर उसळला. संतनगरीत भक्तिमय वातावरण निर्माण झाले, जणू काही भक्तीचा मळा फुलल्याचे चित्र यावेळी पाहायला मिळाले. या पालखी व दिंडी सोहळ्यात टाळ व मृदगांच्या तालावर ठेका धरणारे वारकरी आणि हरिनामाचा गजर करीत संत केजाजी महाराजांच्या जयघोषाने घोराड नगरी अक्षरशः दुमदुमली होती.

येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरातून सकाळी अकरा वाजता पालखी निघाली. यावेळी मुख्य प्रवेशद्वारावर रथाचे पुजन ज्ञानेश्वर महाराज भादंककर तथा अभ्युदय मेघे यांच्या हस्ते पार पडले. यात विविध मंडळानी तयार केलेले आकर्षक रथ, दाखल झालेले अश्व, बँडपथक, आणि भजनी मंडळाचा सहभाग असलेला हा दिंडी सोहळा हरिनामाचा जयघोष करीत मुख्य मंदिराला प्रदक्षिणा घालत संत नामदेव महाराज समाधी स्थळावर पोहचल्यावर अश्वाचा रिंगण सोहळा पार पडला. यावेळी हातात भगव्या पताका घेत धावणारे वारकरी, विणेकरी, पखवाज वादक, डोक्यावर तुळसी वृंदावन, पारायण गाथा घेऊन धावा करीत सहभागी झालेल्या महिला आणि हरीपाठ मंडळाचे वतीने मानवी साखळीद्वारे उंच मनोरा करीत वाजविला जाणारा पखवाज हे सगळे क्षण डोळ्यांचे पारणे फेडणारे ठरलेत. या अविस्मरणीय सोहळ्याचा क्षण प्रत्यक्ष पाहण्यासाठी मैदानावर भाविकांची, महिलांची मोठी गर्दी उसळली होती. या पालखी सोहळ्यानिमित्त गावातील रस्त्यावर महिलांनी रांगोळ्या काढून रस्त्याची सजावट करण्यात आली होती. ठिकठिकाणी स्वागत कमानी उभारण्यात आल्या होत्या. पालखी गावातील प्रमुख मार्गाने जात असताना ठिकठिकाणी पालखीचे स्वागत करण्यात आले. यात सहभागी भाविकांच्या सोयीसाठी ठिकठिकाणी अल्पोपहार, चहा-पाण्याची व्यवस्था ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली होती. मुख्य मार्गाने दिंडी पालखी ग्रामपंचायत मार्गे मुख्य मंदिराजवळ येताच या दिंडी सोहळ्याची सांगता होणार आहे. त्यानंतर बाहेगावातील भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात येणार आहे.

# चोरी प्रकरणात अटकेतील आरोपीला न्यायालयीन कोठडी

**हिंगणघाट :** चोरी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपीची न्यायलयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे,

येथील मारोती वॉर्ड येथे राहणारे डॉ. संदीप मुडे व प्रज्ञा नगरमध्ये राहणारे प्रचलित मून यांच्या घरी चोरी प्रकरणाचा छडा पोलिसांनी लावला, पोलिसांनी शेख तनवीर शेख अल्लाउददीन रा. यशोधरा नगर कामठी रोड नागपूर याला अटक करुन आणले, आरोपी शेख तनवीर यांच्याकडून काही मुददेमाल मिळाल्याची माहिती आहे, पोलिस अधीक्षक, उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार अनिल राऊत यांच्या नेतृत्वात तपास पथक पुढील तपास करीत आहे.

# रोहणा येथील कृउबा शेतकरी सभागृहाचे उद्घाटन



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**आर्वी, दि. २०**

कृषी उत्पन्न बाजार समिती, आर्वीच्या उपबाजार रोहणा येथे शेतकरी भवन सभागृहाचा उद्घाटन? समारंभ संदीप काळे? यांच्या अध्यक्षतेत पार पडला.आमदार सुमित वानखेडे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी शिरीष वाघ, तृप्ती पावडे, विजय वाजपेयी, राजेश ठाकरे, सुनील वाघ, बाजार समितीचे संचालक मंडळ, शेतकरी, सहकार गटाचे सहकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.र सभागृह ७/१२ धारक शेतकऱ्यांना २०टक्के सवलतीच्या दराने मिळणार आहे. ज्यामुळे अप्रत्यक्षपणे शेतकऱ्यांना आर्थिक मदत होणार आहे.येणाऱ्या काळात बाजार समितीच्या माध्यमातून यासारखेच अनेक शेतकरी हितावह उपक्रम हाती घेण्याची ग्वाही संदीप काळे यांनी अध्यक्षीय भाषणातून दिली.तसेच सभागृह्याच्या भाड्यात देण्यात येणाऱ्या २०टक्के सवलतीचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

